# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक-४२२ ००२

रजि. ऑफीस - " आदिवासी विकास भवन ", ३ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक-२

दुरध्वनी - (०२५३) २३१५८६०

Web-www.mahashabari.in E-mail- shabarinsk@gmail.com


## -: संचालक मंडळ सभा इतिवृत्त :-

दि.२३/०७/२०२४ रोजी मा.मंत्री, आदिवासी विकास तथा अध्यक्ष, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., यांचे अध्यक्षतेखाली दुपारी १२.०० वाजता मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेस खालील संचालक / अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | हुद्दा | उपस्थित / अनुपस्थित |
|---|---|---|---|
| १ | मा.नामदार डॉ. विजयकुमार गावित<br>अध्यक्ष, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक तथा मा.मंत्री, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | मा.श्री.विजय वाघमारे<br>सचिव,<br>आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | संचालक | उपस्थित |
| ३ | मा.श्रीमती नयना गुंडे<br>आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक | संचालक | उपस्थित |
| ४ | मा.श्री.रविंद्र जाधव<br>उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | संचालक | उपस्थित |
| ५ | मा.श्रीमती लीना बनसोड<br>व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक | सदस्य सचिव | उपस्थित |

मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने संचालक मंडळाचे सभेस सुरुवात केली आहे.

**विषय क्र.१ - दिनांक २६/०९/२०२३ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त कायम करणे.**

दि.२६/०९/२०२३ रोजी मा.अध्यक्ष, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ तथा मंत्री, आदिवासी विकास यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त तसेच सदर सभेमध्ये पारित झालेल्या ठरावावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सभेस व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर. चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१ :- दि.२६/०९/२०२३ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यात येत आहे. व ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.२- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनांच्या प्रगती बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यांत येते की, सन २०२३-२४ करीता विविध कर्ज योजना राबविणेकामी एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली यांचेकडुन खालील तपशिलाप्रमाणे रक्कम प्राप्त झालेली आहे.

| अ.क्र. | एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना प्रस्तवित केलेला लक्षांक | निधी प्राप्त दिनांक | एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचे पत्र क्र. | प्राप्त निधीनुसार एकुण लक्षांक | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२३ | १३/०९/२०२३ | NSTFDC/PROJ/MAH/643/644/645/3553 Date 19/09/2023 | ६० | ३,८९,५२,०००/- |
| २ | १५० | २२/०९/२०२३ | NSTFDC/PROJ/MAH/641/642/3588 Date 26/09/2023 | ७५ | ४,५०,००,०००/- |
| ३ | ६६८ | २१/११/२०२३ | NSTFDC/PROJ/MAH/646 TO 653/289 Date 28/11/2023 | ४४१ | ११,०१,६०,०००/- |
| | | ०७/०३/२०२४ | NSTFDC/PROJ/MAH/646 to 652/810 Date-14/03/2024 | ११७ | ४,८२,७६,०००/- |
| **एकुण** | **९४१** | | | **६९३** | **२४,२३,८८,०००/-** |

उपरोक्त नमुद केल्यानुसार एकूण मंजुर लक्षांक ९४१ पैकी प्राप्त लक्षांक ६९३ लक्षांकानुसार एकूण ६०८ लाभार्थ्यांना कर्ज वाटपाची कार्यवाही करण्यांत आलेली आहे. उर्वरित ८५ लाभार्थ्यांना शाखा कार्यालयांकडून प्राप्त कर्ज प्रस्तांवानुसार कर्ज वाटपाची कार्यवाही करण्यांत येत आहे.

सदरील विषय सभेचे माहितीस्तव मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केलेला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.२ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनांच्या प्रगती बाबत सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.**

**सुचक :-** मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक :-** मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.३- एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनांच्या धर्तीवर सन २०२४-२५ करीता राज्य शासनाच्या कर्ज योजना लक्षांक निश्चित करणेबाबत.**

**संदर्भ-** १) शासन निर्णय क्रमांक-आविवि-२०२३/प्र.क्र.१३८/का.३ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक- १४ मार्च, २०२४
२) शासन निर्णय क्रमांक-बीयुडी-२०२३/प्र.क्र.०२/का.६ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक- २८मार्च, २०२४
३) शासन पत्र क्र.Comp.No.७७६०१७ File No.MTD-२४०२२/३/२०२४-MTD (Desk ३) दिनांक-०५/०६/२०२४

संदर्भ क्र.१ अन्वये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली च्या धर्तीवर राज्य शासनामार्फत स्वयंरोजगाराच्या कर्ज योजना राबविणेकामी शासन निर्णय मिर्गमित आलेला असुन मार्गदर्शक सुचना देण्यांत आलेल्या आहेत.

तसेच संदर्भ क्र.२ अन्वये एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली च्या धर्तीवर राज्य शासनाकडून स्वयंरोजगारासाठी आदिवासी लाभार्थ्यांकरीता कर्जयोजना राबविणेकामी रक्कम रु.३५.०० कोटी निधी प्राप्त झालेला आहे.

सद्यस्थितीत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत आदिवासी बांधवांसाठी एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत स्वयंरोजगाराच्या कर्ज योजना राबविण्यांत येत असुन सदर योजनांसाठी कर्ज प्रस्ताव मंजुर करतांना www.mahashabari.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑनलाईन कर्ज वितरण प्रणाली द्वारे कर्ज वाटपाची कार्यवाही करण्यांत येत आहे.

त्याचप्रमाणे एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचे मार्गदर्शक तत्वानुसार तसेच संचालक मंडळाच्या दि.२६/०९/२०२३ रोजीच्या सभेतील मंजुर ठराव क्र.७ व ८ नुसार योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजनेचे प्रस्ताव मंजुर करतांना www.mahashabari.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑनलाईन कर्ज वितरण प्रणाली द्वारे कर्ज वाटपाची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता खालीलप्रमाणे योजनानिहाय लक्षांक प्रस्तावित करण्यांत येत आहे.

उपरोक्त नमुद केल्यानुसार शाखा कार्यालयांना लक्षांक विभागून देण्याची कार्यवाही करण्यांत येऊन लक्षांक / उद्दिष्टांप्रमाणे शाखा कार्यालय कार्यक्षेत्रातील कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या योग्य व पात्र लाभार्थ्यांची निवड करुन मुल्यमापन समितीचे शिफारशीसह परिपुर्ण प्रस्ताव मुख्य कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर कर्ज मंजुरीची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

उपरोक्त विषय मा.महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी संचालक मंडळ सभेत सादर केला. यावर मा.अध्यक्ष यांनी विचारणा केली की, वाहनाच्या कर्जाची जास्तीत जास्त मर्यादा व व्याजदर किती, यावर महाव्यवस्थापक

(प्रशासन) यांनी सांगितले की, एन.एस.टी.एफ.सी.नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार रक्कम रु.१०.०० लक्ष पर्यंतच्या कर्जावर लाभार्थीकडून ८% सरळ व्याजदर आकारण्यांत येते. त्यानुसार सद्यस्थितीत वाहन व्यवसायासाठी रक्कम रु.१०.०० लक्ष पर्यंत कर्ज देण्यांत येत असुन त्यावर ८% सरळ व्याजदर आकारणी करण्यांत येते. यावर उपसचिव तथा संचालक यांनी विचारणा केली की, आता वाहनाच्या किमती कीती, यावर महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सांगितले की, काही वाहनाच्या किंमती रक्कम रु.१०.०० लक्ष पेक्षा जास्त असुन रक्कम रु.१५.०० लक्ष पर्यंत वाहनाच्या किंमती आहेत.

त्यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, वाहन व्यवसाय योजनेसाठी कर्जाची राज्याची मर्यादा जास्तीत जास्त रक्कम रु.१५.०० लक्ष पर्यंत करण्यांत यावी.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.३ :- एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनांच्या धर्तीवर राज्य शासनाच्या कर्ज योजना अंमलबजावणी करतांना वाहन व्यवसाय योजनेसाठी कर्जाची राज्याची मर्यादा जास्तीत जास्त रक्कम रु.१५.०० लक्ष पर्यंत करण्यांत यावी.** तसेच खालील योजनांसाठी कर्ज मर्यादा, व्याजाचा दर व कालवधी मंजूर करण्यात आला तपशील खालील प्रमाणे-

| Sr. No. | Schemes Name | State ROI | Loan Period | Unit Cost | Approved Sector Allocation for State project |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Mahila Sablikaran(Rs.2Lakh) | 4% | 5yr | 200000 | 12.58% |
| 2 | Agriculture & Allied Business (Rs.5 Lakh) | 6% | 5yr | 500000 | 7.97% |
| 3 | Self Help Group (5Lakh) | 6% | 5yr | 500000 | 9.00% |
| 4 | Hotel/Dhaba (Rs.5 Lakh) | 6% | 5yr | 500000 | 15.94 (Service Sector) |
| 5 | Workshop/Spare Parts (Rs.5 Lakh) | 6% | 5yr | 500000 | |
| 6 | Vehicle Scheme (Upto Rs.10 Lakh) | 8% | 5yr | 1000000 | 49.88% (Transport Sector) |
| 7 | Vehicle Scheme (Above 10 Lakhs & Upto 15 Lakhs) | 8% | 5yr | 1500000 | |
| 8 | Auto Rickshaw / Goods Transport Rickshaw (Rs.3Lakh) | 6% | 5yr | 300000 | |
| 9 | Small Scale Industries Business (Rs.3Lakh) | 6% | 5yr | 300000 | 4.63% (Industrial Sector) |

**प्राप्त निधीच्या अनुषंगाने शाखा कार्यालय निहाय लक्षांक विभागून देणे, शिल्लक लक्षांक इतर शाखा कार्यालयांना देणे, व ऑनलाईन कर्ज वितरण प्रणाली द्वारे कर्ज वितरणाची व पुढील कार्यवाहीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
**अनुमोदक** :- मा.श्रीमती नयना गुंडे, आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक

## विषय क्र.४- केंद्र तसेच राज्य शासन पुरस्कृत विविध योजनांच्या प्रगतीचा आढावा सादर करणे बाबत.

| Sr. No. | Tenure | Schemes | Funds Received | Expenditure | Balance | UC Submitted | % Utilization |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A | Special Central Assistance (SCA) | | | | | | |
| 1 | 2018-19 | 1 | 2440 | 1181.986 | 1258.0138 | 1181.9862 | 48.44% |
| 2 | 2019-20 | 3 | 3560 | 3248.33195 | 311.66805 | 3248.33195 | 91.24 |
| 3 | 2020-21 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| | Total | 4 | 6000 | 4430.318 | 1569.682 | 4430.0292 | 71.70% |
| B | CCD/PVTGs | | | | | | |
| 1 | 2018-19 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | 2019-20 | 1 | 527 | 527 | 0 | 527 | 100.00% |
| 3 | 2020-21 | 1 | 424.66 | 369.383 | 55.2768 | 369.383 | 86.98% |
| | Total | 2 | 951.66 | 896.383 | 55.2768 | 896.383 | 94.19% |
| C | Provision Under Article 275(1) | | | | | | |
| 1 | 2018-19 | 1 | 2440 | 2032.90488 | 407.0951 | 2032.90488 | 83.32% |
| 2 | 2019-20 | 3 | 1590.75 | 1278.61 | 312.14 | 1278.11 | 80.38% |
| 3 | 2020-21 | 2 | 150 | 129.1 | 20.9 | 129.6 | 86.07% |
| | Total | 6 | 4180.75 | 3440.61488 | 740.135 | 3440.61488 | 82.30% |
| Grand Total | | 12 | 11132.41 | 8767.31588 | 2365.094 | 8767.02708 | 78.75% |

## Special Central Assistance (SCA)

| Sr No | Year | Project Name | Received (₹ Lakhs) | Expenditure (₹ Lakhs) | Balance (₹ Lakhs) | Beneficiary Target | Beneficiary Covered |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A | | Special Central Assistance (SCA) | | | | | |
| 1 | 2018-19 | Organizing FPOs of 15000 farmers for processing, distribution, branding and retailing. | 2440.00 | 1181.99 | 1258.01 | 15000 | 19053 |
| 2 | 2019-20 | | 2440.00 | 2000.32 | 439.68 | | |
| 3 | 2019-20 | Tata Trusts (Collective for Livelihoods initiatives improving HH incomes through layered agriculture-based livelihoods intervention (6000 HHs, Nandurbar) | 620.00 | 620.00 | 0.00 | 3000 | 2934 |
| 4 | 2019-20 | CCD NGO- formation of FPO(s) in Gadchiroli and Yavatmal so as to leverage the benefits arising from collectivizing and to market the produce more efficiently for better price realization | 500 | 499.725 | 0.274 | 5000 | 3273 |
| | | Sub Total | 6000 | 4302.03 | 1697.971 | 23000 | 25260 |
| B | | CCD/PVTGs | | | | | |
| | 2019-20 | EAGL-Goat Rearing intervention for katkari tribes | 527.00 | 527.00 | 0.00 | 1430 | 1109 |
| 1 | 2020-21 | | 424.66 | 369.3832 | 55.2768 | | |
| | | **Sub Total** | **951.7** | **896.38** | **55.277** | **1430** | **1109** |

**Provision under Article 275(1)**

| S. N. | Year | Project Name | Received (₹ Lakhs) | Expenditure (₹ Lakhs) | Balance (₹ Lakhs) | Bene. Target | Bene Covered |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A | | Provision under Article 275(1) | | | | | |
| 1 | 2018-19 | Organizing FPOs of 15000 farmers for processing, distribution, branding and retailing. | 2440 | 2032.9049 | 407.095 | 15000 | 16251 |
| 2 | 2019-20 | | 1440 | 1127.86 | 312.14 | | |
| 3 | 2019-20 | BAIF -Seed Bank for indigenous seed conservation, production, marketing and sale (PO ITDP Rajur) | 50.75 | 50.75 | 0 | 1050 | 1050 |
| 4 | 2020-21 | | 50 | 49.5 | 0.5 | | |
| 5 | 2019-20 | Bharat Rural Livelihoods foundation-Improving livelihood conditions by augmenting land and water resources, sustainable Agri practices, enhancing livestock productivity, capacity building of GPs for IFR/CFR and convergence of government | 100 | 100 | 0 | 15000 | 15000 |
| 6 | 2020-21 | | 100 | 79.6 | 20.4 | | |
| | | **Sub Total** | 4180.750 | 3440.6144 | 740.13562 | 31050 | 32301 |
| | | **Grand Total** | **11132.41** | **8767.3157** | **2365.09427** | **55480** | **58670** |

राज्य शासनाकडून प्राप्त शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची प्रगती अहवाल खालीलप्रमाणे

| Sr No | Project Name | Amount Received (₹ Lakhs) | Expenditure (₹ Lakhs) | Amount unspent (₹ Lakhs) | Beneficiary Target | Beneficiary Covered |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MESCO Paramilitary Training | 100.00 | 91.70 | 8.30 | | 276 |
| 2 | Naturopathy | 143.00 | 36.80 | 106.20 | | 85 |
| 3 | MSRTC-Drivers Training (Shahada) Programme | 534.00 | 361.53 | 172.47 | 100 | |
| 4 | Mahua - Manav Vikas | 336.36 | 336.36 | 0.00 | 4500 | 4500 |
| 5 | Amchur - Manav Vikas | 544.50 | 544.50 | 0.00 | 3000 | 3000 |
| 6 | Pilot Dairy Development Scheme Through JLGs | 159.3050<br>94.5057 | 6072.70 | 9832.31 | 12500 | 4785 |

उपरोक्तप्रमाणे विषय सभेस मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.४ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत केंद्र तसेच राज्य शासनाच्या निधी अंतर्गत राबविण्यांत येत असलेल्या योजनांच्या प्रगती सर्वानुमते मान्य करण्यांत येत आहे.**

**सुचक :-** मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक :-** मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबइ

**विषय क्र.५- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिकच्या आस्थापनेवरील सुधारीत आकृतीबंध लागु करण्यास शासनास शिफारस करणेबाबत.**

**संदर्भ** :- 1) या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/1161/2023 नाशिक दि.24.11.2023

2) या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/1181/2023 नाशिक दि.30.11.2023

राज्य शासनाने शबरी महामंडळास दि.13 डिसेंबर, 1999 च्या शासन निर्णयानुसार कर्मचारी आकृतीबंधास मान्यता दिलेली असुन सदर महामंडळासाठी एकूण 150 पदांपैकी पहिल्या टप्प्यात 72 पदे निर्माण करण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकरीता आवश्यक ती पदे निर्माण करण्याकरीता महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांच्या आस्थापनेवरील एकूण 93 पदे प्रत्यार्पित करुन त्यांच्या समायोजनाद्वारे पहिला टप्पा म्हणून 72 नवीन पदे निर्माण करण्यांस शासनाने मंजुरी दिलेली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या सेवाशर्ती शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यांत आलेल्या आहेत.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाअंतर्गत आज रोजी 72 पदांचा आकृतीबंध मंजुर असुन सद्यस्थितीत एकूण 14 अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत.

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचा सध्याचा आकृतीबंध -**

शासन निर्णय क्र.आविम-1099/प्र.क्र.7/का.3 मंत्रालय, मुंबई-32 दि.13 डिसेंबर, 1999 अन्वये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक साठी पदे निर्माण करण्यांत आली असुन पहिला टप्पा म्हणून 72 पदांचा आकृतीबंध मंजुर करण्यांत आलेला आहे. दि.31/05/2024 अखेर कार्यरत पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | पदाचे नाव | मंजुर पद संख्या | मुख्य कार्यालय नाशिक | जिल्हा / शाखा कार्यालय | एकूण पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | व्यवस्थापक | 13 | 1 | 12 (प्रत्येकी एक) | 13 | 4 | 9 |
| 2 | उप व्यवस्थापक | 1 | 1 | - | 1 | 1 | 0 |
| 3 | लेखापाल | 13 | 1 | 12 (प्रत्येकी एक) | 13 | 7 | 6 |
| 4 | निरीक्षक | 12 | - | 12 (प्रत्येकी एक) | 12 | 0 | 12 |
| 5 | लघुटंकलेखक | 1 | 1 | - | 1 | 0 | 1 |
| 6 | वरीष्ठ सहाय्यक | 2 | 2 | - | 2 | 1 | 1 |
| 7 | रोखपाल | 1 | 1 | - | 1 | 0 | 1 |
| 8 | लिपीक नि संगणक सहाय्यक | 14 | 2 | 12 (प्रत्येकी एक) | 14 | 1 | 13 |
| 9 | वाहन चालक | 1 | 1 | - | 1 | 0 | 1 |
| 10 | शिपाई | 14 | 2 | 12 (प्रत्येकी एक) | 14 | 0 | 14 |
| | **एकूण** | **72** | **12** | **60 (प्रत्येकी 5 पदे)** | **72** | **14** | **58** |

उपरोक्त तपशिलात नमुद केल्याप्रमाणे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळात मंजुर 72 पदांचे आकृतीबंधानुसार सद्यस्थितीत एकूण 14 अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित नाशिकचे अधिनस्त असलेल्या शाखा कार्यालय व त्यांचे कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | शाखा कार्यालय | अधिनस्त कार्यक्षेत्र येणारे जिल्हे |
|---|---|---|
| 1. | नाशिक | नाशिक |
| 2. | जव्हार (जि.पालघर) | ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, मुंबई व उपनगरे |
| 3. | जुन्नर (जि.पुणे) | पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, लातुर, उस्मानाबाद, बीड |
| 4. | नंदूरबार | नंदूरबार, धुळे |
| 5. | यावल (जि.जळगांव) | जळगांव, औरंगाबाद, जालना, बुलढाणा |
| 6. | धारणी (जि.अमरावती) | अमरावती, अकोला |
| 7. | यवतमाळ | यवतमाळ, वाशिम |
| 8. | किनवट (जि.नांदेड) | नांदेड, परभणी, हिंगोली |
| 9. | देवरी (जि.गोंदीया) | भंडारा, गोंदिया |
| 10. | चंद्रपूर | चंद्रपूर |
| 11. | गडचिरोली | गडचिरोली |
| 12. | नागपूर | नागपूर, वर्धा |

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचेमार्फत महामंडळाच्या स्थापनेपासुन आदिवासी लाभार्थ्यांकरीता स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदराने एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत विविध कर्ज योजना, राबविण्यांत येतात. सद्यस्थितीत विशेष केंद्रिय सहाय्य पुरस्कृत योजना तसेच आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांचे जिवनमान उंचावण्यासाठी, कृषि, पशुधन, मस्त्यपालन, मधुमक्षीकापालन तसेच वनौपज आधारित आदिवासींचे उपजीविका वृध्दीसाठी विविध नाविन्यपूर्ण योजना, पथदर्शी दुग्ध विकास प्रकल्प योजना राबविण्यांत येत आहेत. या शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी आदिवासी उपयोजना क्षेत्रांमध्ये करण्यात येते.

**सुधारीत आकृतीबंधाबाबत-**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक साठी पदे निर्माण करण्यांत आली असुन पहिला टप्पा म्हणून 72 पदांचा आकृतीबंध मंजुर असुन सद्यस्थितीत एकुण 14 अधिकारी / कर्मचारी कार्यरत असुन 58 पदे रिक्त आहेत.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळात यापुढे फक्त एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली कडून प्राप्त झालेल्या कर्ज वाटपाचे काम एखाद्यापर्यंतच स्वत:चे काम सिमीत न करता इतर नवीन क्षेत्रात कार्य सुरु आहे.

1) महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभाग मंत्रालयाच्या अंतर्गत आयुक्त, आदिवासी विकास हे प्रामुख्याने शिक्षण व आरोग्य यांच्याशी निगडीत असलेल्या योजना राबवित आहेत. TRTI पूणे ही संस्था प्रामुख्याने प्रशिक्षण व संशोधन च्या कार्याकडे अधिक लक्ष देत आहेत. तसेच शबरी महामंडळ हे प्रामुख्याने रोजगार निर्मितीसाठी कर्जवाटपाचे काम करत आहे. म्हणून कृषी व कृषी संलग्न क्षेत्रात रोजगार निर्मिती करणे हा प्रमुख विषय डोळयासमोर ठेवून यापुढे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ काम करण्यासाठीचे उद्देश समोर ठेवेल. यासाठी या कार्यालयास लागणारे संबंधित पदे निर्माण होणे अपेक्षीत आहेत.

2) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचेमार्फत महामंडळाच्या स्थापनेपासुन आदिवासी लाभार्थ्यांकरीता स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदराने एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत विविध कर्ज योजना, राबविण्यांत येतात. सद्यस्थितीत शबरी महामंडळामार्फत विविध नावीन्यपूर्ण योजना राबविण्यांत येत

आहेत. विशेष केंद्रिय सहाय्य पुरस्कृत योजना तसेच आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांचे जिवनमान उंचावण्यासाठी, कृषि, पशुधन, मस्त्यपालन, मधुमक्षीकापालन तसेच वनौपज आधारित आदिवासींचे उपजीविका वृध्दीसाठी विविध नाविन्यपूर्ण योजना, पथदर्शी दुग्ध विकास प्रकल्प योजना राबविण्यांत येत आहेत. सदर योजना शबरी महामंडळ राबवित असल्याने नवीन पदे निर्माण होणे आवश्यक आहे.

3) शासन निर्णय क्र.आविवि-2023/प्र.क्र.138/का.3 मंत्रालय, मुंबई-32 दि.14 मार्च, 2024 अन्वये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत खालील दोन योजना कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यांत आली आहे

**अ)** एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली (राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली) यांचे धर्तीवर स्वयंरोजगारासाठी चारचाकी प्रवासी वाहन, मालवाहू वाहन, ऑटो रिक्षा, व तत्सम इ. खरेदी करण्यासाठी तसेच कृषीसंलग्न व्यवसाय, ऑटोमोबाईल व्यवसाय, हॉटेल / ढाबा इ. सुरु करण्यासाठी आणि स्वयंरोजगारांतर्गत आदिवासी लाभार्थ्यांसाठी लहान उद्योगधंदे राबविणेकरीता कर्जयोजना राबविणे.

**ब)** राज्यातील आदिवासी बहुल भागात आदिवासींचे शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) स्थापन करुन त्यांना तसेच वनधन केंद्रे, आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, महिला बचत गट, स्वयंसहाय्यता गट यांना प्रशिक्षण, क्षमता बांधणी, व्यवसाय आराखडा तयार करणे, पायाभूत सुविधा उभारणी तसेच खेळते भांडवल इत्यादींकरीता अर्थसहाय्य करणे. सदर योजना शबरी महामंडळामार्फत राबविण्यांत येणार असल्याने नवीन पदे निर्माण होणे आवश्यक आहे.

शबरी आदिवासी वित्त विकास महामंडळाकडुन शासनाकडील विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनांच्या विविध माहितीच्या अनुषंगाने व महामंडळाकडील कार्यालयांचे संगणकीकरण करणे, तांत्रिक पदांची निर्मिती करणे, याबाबतचे नियोजन करण्यात येत आहे. त्यानुसार शासनाच्या कार्यपध्दतीतील तंत्रज्ञानाचा वाढता वापर, काळानुरुप शासनाच्या मनुष्यबळात बदल व मनुष्यबळाचा परिणामकारक वापराची आवश्यकता असुन त्यानुसार सध्याच्या आकृतीबंधामध्ये काही नवीन पदांची निर्मितीची आवश्यकता भासणार आहे. प्रस्तुत प्रस्तावाचे अनुषंगाने सद्यस्थितीत वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक- पदनि-2022/प्र.क्र.2/ 2022/आ.पु.क. दिनांक 31 ऑक्टोबर, 2022 अन्वये पदभरतीवरील निर्बंध शिथिल करण्यात आलेले असुन ज्या कार्यालयांचा सुधारीत आकृतीबंध अद्याप अंतिम झालेला नाही, अशा कार्यालयांतील गट-अ, गट-ब व गट-क मधील (वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे वगळुन) सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या 80 टक्के मर्यादेपर्यंत रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आलेली आहे.

नमुद शासन निर्णयाचे अनुषंगाने देण्यात आलेली शिथिलता केवळ स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील पदभरतीसाठी दिनांक 15.08.2023 पर्यंत लागु असल्याने दरम्यानच्या कालावधीमध्ये, ज्या प्रशासकीय विभागांनी वित्त विभागाच्या दिनांक 11.02.2016 च्या शासन निर्णयातील निर्देशाप्रमाणे सुधारीत आकृतीबंध अद्याप अंतिम मंजुर केलेले नाहीत, त्या प्रशासकीय विभागांनी त्यांचा व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांतील पदांचा आढावा घेऊन उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने सुधारीत आकृतीबंध अंतिम मंजुर करण्याची कार्यवाही तत्परतेने पुर्ण करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

नमुद शासन निर्णय दिनांक 31 ऑक्टोबर, 2022 अन्वये पदभरतीवरील निर्बंध शिथिल करण्यात आलेले असुन ज्या कार्यालयांचा सुधारीत आकृतीबंध अद्याप अंतिम झालेला नाही, अशा कार्यालयांतील गट-अ, गट-ब व गट-

क मधील (वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे वगळुन) सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या 80 टक्के मर्यादेपर्यंत रिक्त पदे भरण्यास मुभा / शिथिलता केवळ स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील पदभरतीसाठी दिनांक 15.08.2023 पर्यंत लागु असल्याने त्याअनुषंगाने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे आस्थापनेवरील गट-ब व गट क मधील रिक्त पदे भरणेकरीताचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

त्यामध्ये सुधारणा करुन शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचा कार्यालयनिहाय सुधारीत कर्मचारी आकृतीबंध शासनाच्या मंजुरीसाठी या प्रस्तावासोबत सादर करण्यांत येत आहे.

प्रस्तुत प्रस्तावाच्या अनुषंगाने आदिवासी विकास महामंडळाचे आस्थापनेवरील नामनिर्देशन व पदोन्नतीच्या पदांचे सेवाप्रवेश नियम व सुधारीत आकृतीबंधास मान्यता प्रदान करण्यात यावी.

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या,नाशिक (एकत्रित नियमित पदे)**

| अ. क्रं | पदनाम | वेतनस्तर | जुन्या आकृती बंधानुसार मंजुर पदसंख्या | सुधारीत आकृती बंधानुसार मंजुर पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| | | गट-अ | | |
| 1. | महाव्यवस्थापक | रु-67700-208700 एस-23 | - | 1 |
| 2. | वरीष्ठ व्यवस्थापक | रु-56100-177500 एस-20 | - | 1 |
| | | गट-ब | | |
| 3. | व्यवस्थापक | रु-41800-132300 एस-15 | 13 | 12 |
| 4. | कंपनी सचिव | रु-41800-132300 एस-15 | - | 1 |
| 5. | व्यवस्थापक लेखा | रु-41800-132300 एस-15 | - | 1 |
| | | गट-क | | |
| 6. | उपव्यवस्थापक | रु-38600-122800 एस-14 | 1 | 13 |
| 7. | लेखापाल | रु-38600-122800 एस-14 | 13 | 14 |
| 8. | कार्यालय अधिक्षक | रु-35400-112400 एस-13 | - | 1 |
| 9. | निरीक्षक | रु-38600-122800 एस-14-जुनी<br>रु-35400-112400 एस-13-सुधारीत | 12 | 12 |
| 10. | वरीष्ठ सहाय्यक | रु-25500-81100 एस-8 | 2 | 2 |
| 11. | लघुटंकलेखक | रु-25500-81100 एस-8 | 1 | - |
| 12. | रोखपाल | रु-19900-63200 एस-6 | 1 | - |
| 13. | लिपीक नि संगणक सहाय्यक | रु-19900-63200 एस-6 | 14 | 14 |
| 14. | वाहनचालक | रु-19900-63200 एस-6 | 1 | - |
| | | गट-ड | | |
| 15. | शिपाई | रु-15000-47600 एस-1 | 14 | - |
| | | **नियमित पदे एकुण :-** | **72** | **72** |

## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिकच्या आस्थापनेवरील

## कार्यालयांचा सुधारीत आकृतीबंधानुसार कार्यालनिहाय गोषवारा

### 1. मुख्य कार्यालय, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, नाशिक

| अ.क्र | पदनाम | वेतनस्तर | जुन्या आकृतीबंधानुसार मंजुर पदसंख्या | सुधारीत आकृतीबंधानुसार मंजुर पदसंख्या | विभाग | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रशा | वित्त |
| | | गट-अ | | | | |
| 1 | महाव्यवस्थापक | रु.67700-208700 एस-23 | 0 | 1 | 1 | 0 |
| 2 | वरिष्ठ व्यवस्थापक | रु.56100-177500 एस-20 | 0 | 1 | 1 | 0 |
| | | गट-ब | | | | |
| 3 | व्यवस्थापक | रु.41800-132300 एस-15 | 1 | 0 | 0 | 0 |
| 4 | कंपनी सचिव | रु.41800-132300 एस-15 | 0 | 1 | 1 | 0 |
| 5 | व्यवस्थापक लेखा | रु.41800-132300 एस-15 | 0 | 1 | 0 | 1 |
| | | गट-क | | | | |
| 6 | उपव्यवस्थापक | रु.38600-122800 एस-14 | 1 | 1 | 1 | 0 |
| 7 | लेखापाल | रु.38600-122800 एस-14 | 1 | 2 | 0 | 2 |
| 8 | कार्यालय अधिक्षक | रु.35400-112400 एस-13 | 0 | 1 | 1 | 0 |
| 9 | निरीक्षक | रु.35400-112400 एस-13 | 0 | 0 | 0 | 0 |
| 10 | वरीष्ठ सहाय्यक | रु.25500-81100 एस-8 | 2 | 2 | 2 | 0 |
| 11 | लघुटंकलेखक | रु.25500-81100 एस-8 | 1 | 0 (मृत संवर्ग) | 0 | 0 |
| 12 | लिपीक नि संगणक सहाय्यक | रु.19900-63200 एस-6 | 2 | 2 | 1 | 1 |
| 13 | रोखपाल | रु-19900-63200 एस-6 | 1 | 0 (मृत संवर्ग) | 0 | 0 |
| 14 | वाहन चालक | रु-19900-63200 एस-6 | 1 | 0 (मृत संवर्ग) | 0 | 0 |
| | | गट-ड | | | | |
| 15 | शिपाई | रु-15000-47600 एस-1 | 2 | 0 (मृत संवर्ग) | 0 | 0 |
| | **एकूण** | | **12** | **12** | **8** | **4** |

### शाखा कार्यालय-12

| अ.क्र | पदनाम | वेतनस्तर | जुन्या आकृतीबंधानुसार मंजुर पदसंख्या | सुधारीत आकृतीबंधानुसार मंजुर पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| | | गट-अ | | |
| 1 | महाव्यवस्थापक | रु.67700-208700 एस-23 | 0 | 0 |
| 2 | वरिष्ठ व्यवस्थापक | रु.56100-177500 एस-20 | 0 | 0 |
| | | गट-ब | | |
| 3 | व्यवस्थापक | रु.41800-132300 एस-15 | 1 (प्रत्येकी १) | 1 (प्रत्येकी १) |
| 4 | कंपनी सचिव | रु.41800-132300 एस-15 | 0 | 0 |
| 5 | व्यवस्थापक लेखा | रु.41800-132300 एस-15 | 0 | 0 |
| | | गट-क | | |
| 6 | उपव्यवस्थापक | रु.38600-122800 एस-14 | 0 | 1 (प्रत्येकी १) |
| 7 | लेखापाल | रु.38600-122800 एस-14 | 1 (प्रत्येकी १) | 1 (प्रत्येकी १) |
| 8 | निरीक्षक | रु.35400-112400 एस-13 | 1 (प्रत्येकी १) | 1 (प्रत्येकी १) |
| 9 | कार्यालय अधिक्षक | रु.35400-112400 एस-13 | 0 | 0 |
| 10 | वरीष्ठ सहाय्यक | रु.25500-81100 एस-8 | 0 | 0 |
| 11 | लघुटंकलेखक | रु.25500-81100 एस-8 | 0 | 0 |
| 12 | लिपीक नि संगणक सहाय्यक | रु.19900-63200 एस-6 | 1 (प्रत्येकी १) | 1 (प्रत्येकी १) |
| 13 | रोखपाल | रु.19900-63200 एस-6 | 0 | 0 |
| 14 | वाहन चालक | रु.19900-63200 एस-6 | 0 | 0 |
| | | गट-ड | | |
| 15 | शिपाई | रु.15000-47600 एस-1 | 1 (प्रत्येकी १) | 0 |
| | **एकूण** | | **60** | **60** |

## 5. बाह्यस्त्रोताद्वारे घ्यावयाच्या सेवा :-

शासनावरील खर्च आटोक्यात ठेऊन विकास कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शक्य असेल तेथे नवीन पदनिर्मिती न करता सदरची कामे बाह्ययंत्रणेकडुन करुन घेणेबाबत तसेच अशी कामे करण्याबाबतची कार्यपध्दती बाबत शासनाकडुन निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे शासन परिपत्रक दि.02.12.2013 नुसार बाह्ययंत्रणेद्वारे सेवा घेण्यासाठी काल्पनिक पदांची संकल्पना निर्माण करण्यात आलेली असुन त्यास उच्चस्तरीय समितीने मंजुरी दिलेली आहे.तसेच शासन परिपत्रक दि.02.08.2016 अन्वये बाह्ययंत्रणेकडुन कामे करुन घ्यावयाच्या पदांचे कुशल व अकुशल असे वर्गीकरण करण्यात आलेले असुन त्याबाबतची कार्यपध्दती विहीत केलेली आहे.

शासन परिपत्रक दि.27.04.2022 नुसार बाह्ययंत्रणेकडुन कामे करुन घेण्यासंदर्भातील सर्वसमोवशक आदेश शासनाकडुन निर्गमित करण्यात आलेले आहेत. नमुद शासन निर्णयांतील तरतुदींनुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिकच्या आस्थापनेकरीता खालील तपशिलामध्ये बाह्यस्त्रोताद्वारे घ्यावयाच्या सेवा येथे दर्शविलेल्या मनुष्यबळ संख्येच्या मर्यादेत सेवा घेणे आवश्यक असुन त्याप्रमाणे मंजुरी मिळावी.

| अ.क्रं | सेवा | सध्या मंजुर सेवा | सुधारीत आकृतीबंधानुसार मंजूर पदसंख्या |
|---|---|---|---|
| 1. | वाहनचालक | 0 | 1 (शा.नि.29.06.2017 व दि.27.04.2022 नुसार महामंडळा कडील कार्यालयांच्या संख्येप्रमाणे एकुण 1 वाहनचालक व 14 शिपाई यांच्या सेवा बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध करुन घेण्यात येतील.) |
| 2. | शिपाई | 0 | |

**प्रस्ताव :-** वरील प्रस्तुत प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील नमुद बाबींच्या अनुषंगाने मान्यता मिळणेकरीता प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

1. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचा कार्यालयनिहाय एकुण 72 पदांच्या सुधारीत कर्मचारी आकृतीबंधास मंजुरी देणे.
2. सुधारीत पदांचे नामनिर्देशन व पदोन्नतीचे सेवाप्रवेश नियम, पदांचे कर्तव्य व जबाबदारी व सेवाप्रवेशोत्तर / विभागीय परीक्षा नियमांना मंजुरी देणे.

उपरोक्त प्रमाणे सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यांत आलेला असुन सदर विषय मा.संचालक मंडळ सभेच्या मान्यतेस मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केलेला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.५ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिकच्या आस्थापनेवरील सुधारीत आकृतीबंध लागु करण्यास शासनास शिफारस करणेबाबत सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.**

**सुचक :-** मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक :-** मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.६ शबरी महामंडळाद्वारे घेण्यांत आलेल्या विविध माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्पांचा अंमलबजावणी अहवाल सादर करणे बाबत.**

१ एन. एस. टी. एफ. डी. सी. नवी दिल्ली पुरस्कृत विविध कर्ज योजनांसाठी ऑनलाईन कर्ज वितरण प्रणाली विकसीत करणे,

२ शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे संकेतस्थळ निर्मिती (Website Development)

3 "Organization of FPOs of १५००० farmers for processing, Distribution, branding and retailing" या योजनेकरिता ऑनलाईन प्रकल्प व्यवस्थापन व सनियंत्रण प्रणाली (Project Management & Monitoring System) प्रणाली विकसीत करणे

४ कौशल्य विकास योजनेकरीता एकलव्य कुशल वेब पोर्टल ची निर्मिती करणे.

उपरोक्त विषयान्वये शबरी महामंडळाचे विविध योजना राबविणेसाठी महामंडळाचे वरील प्रमाणे संगणक आज्ञावली तयार करण्यांत आली आहे. यासाठी बँक ऑफ बडोदा व कॅमरा बँक यांनी Sponsership घेतली व इतर संगणक आज्ञावली विकसित करण्यासाठी प्राप्त झालेल्या भागभांडवलाच्या निधीतून विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन खर्च करण्यांत आला आहे.

उपरोक्तप्रमाणे अंमलबजावणी अहवाल सभेस व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.६ :- शबरी महामंडळाद्वारे घेण्यांत आलेल्या विविध माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्पांचा अंमलबजावणीस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.**

**सुचक :-** मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक :-** मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.७ शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, मुख्य कार्यालय नाशिक येथे उद्योजकता व कौशल्य विकास कक्षाची स्थापना करणे बाबत.**

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. विकेस-२०२१/प्र. क्र.१६/का.१९ दिनांक २५ जानेवारी, २०२३ अन्वये आदिवासी विकास विभागांतर्गत, आदिवासी लोकांसाठी स्वयंरोजगार व उद्योगांसाठी मार्गदर्शन करणे, आदिवासी महिलांना प्रशिक्षण देणे व कौशल्य विकासाची नियमित योजना (लेखाशीर्ष २२२५ डी २६२) या योजना शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ या कार्यालयाकडे वर्ग करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत आदिवासी विकास विभागांतर्गत रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शबरी महामंडळ, मुख्य कार्यालय, नाशिक येथे **मानधन तत्वावर** उद्योजकता व कौशल्य विकास कक्षाची स्थापना करुन, किमान ०६ मनुष्यबळाची नियुक्ती करणे

आवश्यकता आहे. सदर मनुष्यबळाचा खर्च, सदर योजनेकरिता प्राप्त होणा-या एकुण निधीपायकी २% रक्कम प्रशासकिय शुल्क म्हणुन तरतुद उपलब्ध करुन देणेबाबत शासनास सादर करण्यात आला आहे.

उद्योजकता व कौशल्य विकास कक्षाकरिता आवश्यक मनुष्यबळाचा आराखडा सादर केला

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.७ :- शबरी महामंडळ, मुख्य कार्यालय, नाशिक येथे शासनाकडुन प्राप्त होणाऱ्या व्यवस्थापकीय अनुदानातुन मानधन तत्वावर उद्योजकता व कौशल्य विकास कक्षाची स्थापना करुन, ०६ कंत्राटी मनुष्यबळाची नियुक्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे. तसेच पदांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या, मानधन, निवडीचे निकष व निवड प्रक्रिया ठरविण्याचे तसेच अंमलबजावणीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यांत येत आहेत.**

| अक्र | पदनाम | पद संख्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | उद्योजकता व कौशल्य विकास सल्लागार | ०१ |
| २ | प्रकल्प समन्वयक (कौशल्य विकास) | ०२ |
| 3 | माहिती तंत्रज्ञान सल्लागार | ०१ |
| ४ | कनिष्ठ सहाय्यक | ०२ |
| | **एकुण पदे** | ०६ |

**सुचक :-** मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक :-** मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.८ आदिवासी विकास विभागाअंतर्गत रोजगाराभिमुख कौशल्य विकास कार्यक्रम (एकलव्य कुशल) योजनेअंतर्गत लक्षांक निश्चित करण्याबाबत.**

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. कौविका-२०२२ विकेस प्र. क्र.४६/ का. ०९, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२४ अन्वये **शासनाने "आदिवासी विकास विभागांतर्गत रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम"** मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत आदिवासी विकास विभागांतर्गत रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयानुसार या योजनेअंतर्गत विहीत पद्धती अंवलंबुन प्रशिक्षण संस्थांची अंतिम निवड करण्याचे अधिकार मा. व्यवस्थापकिय संचालक यांना प्रदान करण्यात आले आहेत.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने दिनांक २१.०५.२०२४ रोजीच्या पत्राअन्वये कौशल्य विकास योजनेअंतर्गत **एकुण १३८०० आदिवासी युवक-युवतींच्या प्रशिक्षण व निवास भोजन खर्चासाठी अंदाजित रु.५०४४.८४ लक्ष निधी मिळणेबाबत शासनास मागणी केली आहे.**

त्यानुसार आदिवासी विकास विभागांतर्गत रोजगाराभिमुख कौशल्य विकास कार्यक्रम (एकलव्य कुशल) अंतर्गत अनुसूचित जमातीच्या अंदाजित एकुण १३८०० युवक-युवतींना विविध कौशल्य विकास प्रशिक्षण देणे प्रस्तावित आहे. करीता मान्यतेस्तव सादर.

उपरोक्तप्रमाणे विषय सभेस मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.८ :- आदिवासी विकास विभागाअंतर्गत रोजगाराभिमुख कौशल्य विकास कार्यक्रम (एकलव्य कुशल) योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या एकूण १३८०० लाभार्थ्यांचा लक्षांक निश्चित करण्यांस तसेच त्यांना विविध कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यांस सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.**

**सुचक :-** मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक :-** मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.९ शबरी महामंडळातंर्गत स्थापन करण्यांत आलेल्या उपजिविका कक्षाचे बळकटीकरण करण्याबाबत.**

शबरी महामंडळामार्फ महाराष्ट्र राज्यातील आदिवासी बहुल भागात केंद्र व राज्य शासनाअंतर्गत विशेष केंद्रिय सहाय्य (SCA), भारतीय राज्यघटनेच्या परिच्छेद २७५ (१), आदिम जमाती विकास, (CCD/ PVTGs), NSTFDC (केंद्र व राज्य), वनधन विकास योजना, Organization of FPO अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत. तसेच पर्यटन विकासाची नवीन योजना शबरी महामंडळामार्फत राबविण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे शबरी महामंडळामार्फत एकुण जवळपास वार्षिक रु.५००.०० कोटी उलाढाल असणा-या योजना राबविण्यात येत आहेत.

सदर योजनांसाठी सद्यस्थितीत शबरी महामंडळाकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ अपुरे पडत असल्याने, शबरी महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या योजनांची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी उपजिविका वृद्धी कक्षात खालील प्रमाणे मनुष्यबळाची नितांत आवश्यकता आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | आवश्यक पदांची संख्या |
|---|---|---|
| १. | सल्लागार- Financial Inclusion | ०१ |
| २. | सल्लागार- Capacity Building | ०१ |
| ३. | सल्लागार –वनधन विकास (PVTG-VDVK) | ०१ |
| ४. | सल्लागार – वित्त (Finance) | ०१ |
| ५. | प्रकल्प समन्वयक (मुख्य कार्यालय तसेच शाखा कार्यालय निहाय) | ०८ |
| ६. | कनिष्ठ सहाय्यक (मुख्य कार्यालय) | ०२ |

वरील प्रमाणे नमुद केलेनुसार शबरी महामंडळामध्ये स्थापन करण्यात आलेल्या उपजिविका वृद्धी कक्षात कंत्राटी/मानधन तत्वावर मनुष्यबळ भरती करणे, त्यांचे मासिक मानधन निश्चित करणे तसेच त्यांच्या कर्तव्य व जबाबदा-या निश्चित करण्याचे अधिकार मा. व्यवस्थापकिय संचालक यांना देण्यास मान्यता मिळावी.

**यावर मा.सचिव महोदयांनी आयुक्त कार्यालयामार्फत स्थापन करण्यांत आलेल्या SPMU कक्षामधील तज्ञ सल्लागार यांच्या मानधनानुसार शबरी महामंडळातील नियुक्त तसेच भविष्यात नियुक्त करण्यांत येणारे सल्लागार / तज्ञ मनुष्यबळ यांचे मानधन समकक्ष करावे असे सुचित केले.**

**आयुक्त कार्यालयातील SPMU कक्षातील पदांची माहिती**

| Sr. No. | Post | Honorarium (Rs. Per Month) |
|---|---|---|
| 1 | Account Expert | 65000 |
| 2 | Legal Expert | 65000 |
| 3 | Public Relation Officer (PRO) | 65000 |
| 4 | Project Associate | 75000 |
| 5 | Project Associate (Shabari) | 75000 |
| 6 | Project Associate (TRTI) | 75000 |

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे शबरी महामंडळ उपजिविका कक्ष बळकटीकरण करण्याबाबतचा ठराव संमत करण्यांत येत आहे.

**ठराव क्र.९ :- शबरी महामंडळ उपजिविका कक्षाचे खालील प्रमाणे बळकटीकरण करण्यास याद्वारे मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.**

**शबरी महामंडळ उपजिविका तसेच कौशल्य विकास कक्ष**

| Sr. No. | Post | Current Honorarium (Rs. Per Month) | Honararium (Rs. Per Month) | No. of Posts |
|---|---|---|---|---|
| 1 | Senior Consultant | Up to 150000 | Up to 150000 | 1 |
| A | **Livelihoods Cell** | | | |
| 2 | Consultant - Agri. Business Expert | Up to 65000 | Up to 75000 | 1 |
| 3 | Consultant - Livestock & Fisheries Expert | Up to 65000 | Up to 75000 | 1 |
| 4 | Consultant - MIS & Data Analysis Expert | Up to 50000 | Up to 65000 | 1 |
| 5 | Consultant - Monitoring & Evaluation Expert | Up to 65000 | Up to 75000 | 1 |
| 6 | Consultant - Capacity Building | | Up to 75000 | 1 |
| 7 | Consultant - Van Dhan Scheme | | Up to 75000 | 1 |
| 8 | Consultant Financial Inclusion | | Up to 75000 | 1 |
| 9 | Consultant Finance | | Up to 65000 | 1 |
| 10 | Project Coordinator - Media & Mass Communication | Up to 40000 (Young Professional - Media & Mass Communication) | Up to 65000 | 1 |
| 11 | Project Coordinator - Livelihoods | Up to 40000 (Young Professional - Livelihoods)) | Up to 65000 | 1 |
| 12 | Project Coordinator - Branch Office | | Up to 65000 | 8 |
| B | **Skill Development Scheme** | | | |
| 13 | Consultant - Skill Development Expert | Up to 65000 | Up to 75000 | 1 |
| 14 | Consultant - IT (Skill Development) | | Up to 65000 | 1 |
| 15 | Project Coordinator - Skill Development | | Up to 65000 | 2 |
| 16 | Junior Assistant (Livelihood & Skill) | | Up to 30000 | 4 |

**सुचक** :- मा.श्रीमती नयना गुंडे, आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
**अनुमोदक** :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.१० शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी G.S.T. नंबर काढणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या महामंडळाची स्थापना शासनाचे आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, शासन निर्णय क्र.आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/का.३ मुंबई दिनांक-०९ डिसेंबर १९९८ अन्वये करण्यांत आलेली आहे.

सद्यस्थितीत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक अंतर्गत आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांचे जिवनमान उंचावण्यासाठी, कृषि, पशुधन, मस्त्यपालन, मधुमक्षीकापालन तसेच वनौपज आधारित आदिवासींचे उपजीविका वृध्दीसाठी विविध योजना राबविण्यांत येत आहेत.

लाभार्थीचे कर्जावरील व्याज व बँकेतील गुंतवणूकी वरील व्याज हे सरासरी प्रत्येक वर्षी २० लाखापेक्षा जास्त प्राप्त होते. करीता शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी G.S.T. नंबर काढणेबाबत विषय महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी मा. संचालक मंडळाचे मान्यतेस सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१० :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी G.S.T. नंबर काढण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.११ शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे ब्रॅन्डींग प्रॉडक्टचे पॅकेजिंग प्रक्रीयेबाबत आढावा सादर करणे.**

शबरी महामंडळामार्फत आदिवासी बांधवांच्या उपजिविका वृद्धी करीता विविध प्रकल्प राबविण्यांत येत असुन त्यायोगे निरनिराळ्या वस्तु उत्पादित करण्यांत येत आहेत. या वस्तुंना उत्तम बाजारपेठ मिळवून देण्याच्या दृष्टीने शबरी महामंडळाचा राज्यस्तरीय ब्रँड विकसित करणे आवश्यक आहे. त्याकरीता केंद्र शासनाच्या SCA व Article २७५(१) या योजनांच्या खर्चामधून प्राप्त होणाऱ्या २% प्रशासकीय खर्चामधून प्राप्त होणाऱ्या निधीतून विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन **Design Nonstop, Nashik या** संस्थेला मंजुरी देण्यांत आलेली आहे.

सदरील प्रक्रीयेस मा.संचालक मंडळ सभेच्या अवलोकनार्थ तथा मान्यतेसाठी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.११ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे ब्रॅन्डींग प्रॉडक्टचे पॅकेजिंग च्या अनुषंगाने केलेल्या प्रक्रीयेस व दरास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.**

**सुचक :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक**
**अनुमोदक :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

**विषय क्र.१२ श्री.अशोक सुराणा, कंपनी सचिव यांचे नियुक्तीस मुदतवाढ देणेबाबत.**

कंपनी कायद्यानुसार शबरी महामंडळाचे कामकाज करणेकामी श्री.अशोक सुराणा, यांची दि.०८/०९/२०२३ ते दि.०७/०८/२०२४ कालावधीसाठी दरमहा रक्कम रु.९०००/- प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर कंपनी सचिव म्हणून नेमणूक करण्यांत आलेली आहे.

सदरील नेमणूक दि.०७/०८/२०२४ रोजी संपुष्टात येत असल्याने श्री.अशोक सुराणा, कंपनी सचिव यांना पुढील ११ महिने कालावधीसाठी दरमहा रक्कम रु.९०००/- प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर कंपनी सचिव म्हणून नेमणूक करणेकामी विषय मा.संचालक मंडळ सभेच्या मान्यतेस सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१२ :- श्री.अशोक सुराणा, कंपनी सचिव यांना पुढील ११ महिने कालावधीसाठी दरमहा रक्कम रु.९०००/- प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर कंपनी सचिव म्हणून नेमणूक करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.**

**सुचक :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक**
**अनुमोदक :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

**विषय क्र.१३ शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे अधिकारी / कर्मचारी यांना तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यास शासनास शिफारस करणेबाबत.**

**संदर्भ :-** १.शासन निर्णय क्र.आविम २३९६/४५/प्र.क्र.३९/का.३/१९९८ दि.०९/१२/१९९८
२.शासन निर्णय क्र.आविम-१०९९/प्र.क्र.७/का.३ मंत्रालय, मुंबई दि.१३ डिसेंबर, १९९९
३.शासन निर्णय क्र.वेपुर-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-९ मंत्रालय, मुंबई-३२ दि.०१ जानेवारी, २०१९
४.शासन निर्णय क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/सेवा-३ मंत्रालय, मुंबई-३२ दि.०१ जानेवारी, २०१९
५.संचालक मंडळ सभा दि.१५.०१.२०१९ मधील आयत्या वेळेचा ठराव क्र.४
६.या कार्यालय स्तरावरील गठीत समितीचा अहवाल जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/सातवे वेतन/७१४/२०१९ दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९
७.शासन निर्णय क्र.आविमं-१५१९/प्र.क्र.१५४/का.१५ मंत्रालय, मुंबई-३२ दि.१९ जानेवारी, २०२२
८.शासन निर्णय क्र.आविमं-१५१९/प्र.क्र.१५४/का.१५ मंत्रालय, मुंबई-३२ दि.२० जानेवारी, २०२२

राज्य शासनाने शबरी महामंडळास दि.१३ डिसेंबर, १९९९ च्या शासन निर्णयानुसार कर्मचारी आकृतीबंधास मान्यता दिलेली असुन सदर महामंडळासाठी एकूण १५० पदांपैकी पहिल्या टप्प्यात ७२ पदे निर्माण करण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकरीता आवश्यक ती पदे निर्माण करण्याकरीता महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांच्या आस्थापनेवरील एकूण ९३ पदे प्रत्यार्पित करुन त्यांच्या समायोजनाद्वारे पहिला टप्पा म्हणून ७२ नवीन पदे निर्माण करण्यांस शासनाने मंजुरी दिलेली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या सेवाशर्ती शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यांत आलेल्या आहेत.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाअंतर्गत आज रोजी ७२ पदांचा आकृतीबंध मंजुर असुन सद्यस्थितीत एकूण १४ अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत.

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचा सध्याचा आकृतीबंध -**

शासन निर्णय क्र.आविम-१०९९/प्र.क्र.७/का.३ मंत्रालय, मुंबई-३२ दि.१३ डिसेंबर, १९९९ अन्वये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक साठी पदे निर्माण करण्यांत आली असुन पहिला टप्पा म्हणून ७२ पदांचा आकृतीबंध मंजुर करण्यांत आलेला आहे. दि.३०/०४/२०२४ अखेर कार्यरत पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | पदाचे नाव | मंजुर पद संख्या | मुख्य कार्यालय नाशिक | जिल्हा / शाखा कार्यालय | एकूण पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापक | १३ | १ | १२ (प्रत्येकी एक) | १३ | ४ | ९ |
| २ | उप व्यवस्थापक | १ | १ | - | १ | १ | ० |
| ३ | लेखापाल | १३ | १ | १२ (प्रत्येकी एक) | १३ | ७ | ६ |
| ४ | निरीक्षक | १२ | - | १२ (प्रत्येकी एक) | १२ | ० | १२ |
| ५ | लघुटंकलेखक | १ | १ | - | १ | ० | १ |
| ६ | वरीष्ठ सहाय्यक | २ | २ | - | २ | १ | १ |
| ७ | रोखपाल | १ | १ | - | १ | ० | १ |
| ८ | लिपीक नि संगणक सहाय्यक | १४ | २ | १२ (प्रत्येकी एक) | १४ | १ | १३ |
| ९ | वाहन चालक | १ | १ | - | १ | ० | १ |
| १० | शिपाई | १४ | २ | १२ (प्रत्येकी एक) | १४ | ० | १४ |
| | **एकूण** | **७२** | **१२** | **६० (प्रत्येकी ५ पदे)** | **७२** | **१४** | **५८** |

उपरोक्त तपशिलात नमुद केल्याप्रमाणे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळात मंजुर ७२ पदांचे आकृतीबंधानुसार सद्यस्थितीत एकूण १४ अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत.

संदर्भ क्र.७ व ८ अन्वये शासन निर्णयानुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे नियमित श्रेणीतील अधिकारी / कर्मचाऱ्यांना दि.०१ जुलै, २०२१ पासून सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत वेतनश्रेणी मंजुर करण्यांत आलेली आहे.

दि.१५.०१.२०१९ रोजी मुंबई येथे संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेतील आयत्या वेळेचा ठराव क्र. ४ नुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे नियमित श्रेणीतील अधिकारी / कर्मचाऱ्यांना तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी मंजुरी देण्यांत आलेली आहे.

तसेच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामध्ये दि.०१.०१.२०१६ रोजी नियमित सेवेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासनाप्रमाणे सातवे वेतन आयोगाच्या शिफारशी लागु करणेसंबंधी समिती गठीत करण्यांत आली असुन सदर समितीची दि.१४.०२.२०१९ रोजी मुख्य कार्यालय नाशिक येथे सभा संपन्न झालेली आहे.

सदर समितीचे अहवालानुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत वेतनश्रेणी लागू करणेकामी तथा शासन निर्णय क्र.वेतन-१९१९/प्र.क्र.३/सेवा-३ मंत्रालय, मुंबई-३२ दि.०१ जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयानुसार शबरी महामंडळातील नियमित सेवेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांना तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यांस शिफारस केलेली आहे.

वरील सर्व बाबींचे अवलोकन होऊन शबरी महामंडळातील नियमित सेवेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांना संदर्भिय क्र.४ च्या शासन निर्णयानुसार तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणेकामी शासनास प्रस्ताव सादर करणेकामी मा.संचालक मंडळाचे मान्यतेस विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१३ :- शबरी महामंडळातील नियमित सेवेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांना शासन निर्णय क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/सेवा-३ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.०१ जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयानुसार तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणेकामी शासनास प्रस्ताव सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.**

**सुचक :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक**
**अनुमोदक :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

**विषय क्र.१४ :- दिनांक ०१/०९/२०२३ ते ३०/०६/२०२४ या कालावधीत महामंडळाने केलेल्या गुंतवणुक / फेर गुंतवणुकीचा अहवाल सादर करणेबाबत.**

दिनांक २८/०६/२००६ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या सभेतील ठराव क्र.५ नुसार महामंडळाकडुन करण्यात येणा-या गुंतवणुकीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

दिनांक ०१/०४/२०२३ ते दिनांक ३१/०८/२०२३ अखेरपर्यंतच्या गुंतवणुकीच्या कार्यवाहीस दिनांक २६/०९/२०२३ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या सभेकडुन ठराव क्र.४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

मु. का. नाशिक चे पत्र क्र. शआविविम/लेखा/२८०/२०१७ दिनांक ०८/०७/२०१७ अन्वये महामंडळाला डोअर स्टेप देणाऱ्या बॅकांकडुन पत्र मागविण्यात आले होते. त्यानुसार ज्या राष्ट्रीयकृत बँकांकडुन महामंडळाच्या गुंतवणुकीच्या अटी व शर्ती मान्य असणारे पत्र प्राप्त झाल्यास सदरच्या बँकांमध्ये गुंतवणुक करण्यात आलेली आहे. या पुढे सुध्दा महामंडळाच्या अटी व शर्ती ज्या राष्ट्रीयकृत बॅकाना मंजुर असतील त्याचे कडुन लेखी पत्र घेवुन गुंतवणुक करण्यासाठी महामंडळाच्या पॅनलमध्ये समावेश करण्यांचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्याचे मान्यतेस सादर.

दिनांक ०१/०९/२०२३ ते दिनांक ३०/०६/२०२४ या कालावधीतील शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक कार्यालयाने राष्ट्रियकृत बँकेत केलेल्या मुदत ठेव गुंतवणुक / फेरगुंतवणुकीचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | राष्ट्रीयकृत बँकेचे नाव | गुंतवणुक दिनांक | मुदत | व्याजदर | रक्कम रुपये लक्ष |
|---|---|---|---|---|---|
| **अ)** | **बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक खाते क्र. २००४६६१५९५६ येथुन करण्यात आलेल्या मुदतठेव गुंतवणुका** | | | | |
| १ | पंजाब नॅशनल बँक, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक | ०३/१०/२०२३ | ३० दिवस | ३.५०% | १,१५,००,०००/- |
| २ | कॅनरा बँक, गंगापुर रोड, नाशिक | १३/११/२०२३ | १ वर्ष | ७.४७% | ५,७२,८१,९७१/- |
| ३ | युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा नाशिक सिटी, नाशिक | २३/०१/२०२४ | १ वर्ष | ७.५०% | ४,५३,४०,३१६/- |
| ४ | युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा नाशिक सिटी, नाशिक | २७/०२/२०२४ | १ वर्ष | ७.५०% | ४,३२,१२,४५२/- |
| ५ | युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा नाशिक सिटी, नाशिक | १४/०३/२०२४ | १ वर्ष | ७.५०% | २,५०,००,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | ०३/०५/२०२४ | ९१ दिवस | ७.१५% | १८,४०,८४,०००/- |
| ७ | बँक ऑफ बडोदा, शाखा एम.जी. रोड, नाशिक | २१/०५/२०२४ | १ वर्ष | ६.८५% | १,६८,८८,७८७/- |
| ८ | बँक ऑफ बडोदा, शाखा आर.के., नाशिक | १०/०६/२०२४ | १ वर्ष | ७.५५% | ८,१७,३८,९८०/- |
| **ब)** | **बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक खाते क्र. ६०३४४९०९११९८ येथुन करण्यात आलेल्या मुदतठेव गुंतवणुका** | | | | |
| ९ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | ०१/०९/२०२३ | ३० दिवस | ६.६०% | ५,१०,८४,४१०/- |
| १० | पंजाब नॅशनल बँक, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक | ०३/१०/२०२३ | ३० दिवस | ६.००% | ५,१३,६१,५२५/- |
| ११ | कॅनरा बँक, गंगापुर रोड, नाशिक | १३/१०/२०२३ | ९१ दिवस | ७.१०% | ५,८७,८१,६५८/- |
| १२ | कॅनरा बँक, गंगापुर रोड, नाशिक | १७/१०/२०२३ | १८१ दिवस | ७.३०% | ५,७३,४५,८२३/- |
| १३ | युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा नाशिक सिटी, नाशिक | ०१/११/२०२३ | १ वर्ष | ७.४०% | २,२५,५१,३९८/- |
| १४ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | ०२/११/२०२३ | ३० दिवस | ६.५०% | ५,१६,१४,८१५/- |
| १५ | कॅनरा बँक, गंगापुर रोड, नाशिक | ०३/११/२०२३ | ९१ दिवस | ७.२०% | १०,५८,१५,०१४/- |
| १६ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | १२/०१/२०२४ | ३० दिवस | ६.८०% | ५,९८,२२,१७४/- |
| १७ | कॅनरा बँक, गंगापुर रोड, नाशिक | ०२/०२/२०२४ | ९१ दिवस | ७.१०% | ४,००,००,०००/- |
| १८ | कॅनरा बँक, गंगापुर रोड, नाशिक | ०५/०२/२०२४ | ९१ दिवस | ७.३०% | १०,७८,०४,१६६/- |
| १९ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | १२/०२/२०२४ | ३० दिवस | ६.७५% | ६,०१,५६,५२३/- |
| २० | युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा नाशिक सिटी, नाशिक | २७/०२/२०२४ | ९१ दिवस | ७.६२% | २२,००,००,०००/- |
| २१ | पंजाब नॅशनल बँक, शाखा शरणपुर रोड, नाशिक | २७/०२/२०२४ | २१ दिवस | ६.००% | ४,००,००,०००/- |
| २२ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | १४/०३/२०२४ | ३० दिवस | ६.००% | २,००,००,०००/- |
| २३ | कॅनरा बँक, गंगापुर रोड, नाशिक | २२/०३/२०२४ | ६० दिवस | ७.६५% | १४,००,००,०००/- |
| २४ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | १५/०४/२०२४ | ६० दिवस | ६.९५% | ७,९५,२०,३७२/- |
| २५ | कॅनरा बँक, गंगापुर रोड, नाशिक | ०३/०५/२०२४ | ९१ दिवस | ६.८०% | ४,०७,१८,०२७/- |
| २६ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | ०६/०५/२०२४ | ९१ दिवस | ७.१५% | १०,९८,६०,२७२/- |
| २७ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | २१/०५/२०२४ | ९१ दिवस | ७.१५% | १४,१७,६०,५४८/- |
| २८ | पंजाब नॅशनल बँक, शाखा शरणपुर रोड, नाशिक | २८/०५/२०२४ | ९१ दिवस | ७.३१% | २२,४१,७९,५१८/- |
| २९ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | १४/०६/२०२४ | ९१ दिवस | ६.७०% | ८,०४,२८,८६५/- |
| **क)** | **युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा नाशिक सिटी, नाशिक खाते क्र. ३२३८०२०११०१५४५७ येथुन करण्यात आलेल्या मुदतठेव गुंतवणुका** | **गुंतवणुक दिनांक** | **मुदत** | **व्याजदर** | **रक्कम रुपये लक्ष** |
| ३० | बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनडा कॉर्नर, नाशिक | १३/१०/२०२३ | ३० दिवस | ६.५१% | ५०,४४,७३,९७३/- |
| ३१ | पंजाब नॅशनल बँक, शाखा शरणपुर रोड, नाशिक | २९/११/२०२३ | ३० दिवस | ६.७५% | ५०,००,०१,०००/- |
| ३२ | पंजाब नॅशनल बँक, शाखा शरणपुर रोड, नाशिक | २९/११/२०२३ | ३० दिवस | ६.७५% | ५०,००,०१,०००/- |
| ३३ | पंजाब नॅशनल बँक, शाखा शरणपुर रोड, नाशिक | २९/१२/२०२३ | ३० दिवस | ७.३६% | २५,००,०१,०००/- |
| ३४ | कॅनरा बँक, गंगापुर रोड, नाशिक | २९/१२/२०२३ | ९१ दिवस | ७.४५% | ५०,००,०१,०००/- |
| ३५ | पंजाब नॅशनल बँक, शाखा शरणपुर रोड, नाशिक | २९/०१/२०२४ | ३० दिवस | ७.२५% | २५,१५,१३,३३५/- |
| ३६ | पंजाब नॅशनल बँक, शाखा शरणपुर रोड, नाशिक | २८/०२/२०२४ | ३० दिवस | ७.२५% | २५,३०,१२,०७९/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | ३०/०३/२०२४ | ६० दिवस | ७.५५% | ७५,००,००,०००/- |
| ३८ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | ३०/०३/२०२४ | ६० दिवस | ७.५५% | ३२,८०,००,०००/- |
| ३९ | कॅनरा बँक, गंगापुर रोड, नाशिक | ०८/०४/२०२४ | ६० दिवस | ७.००% | ४५,१०,००,०००/- |
| ४० | बँक ऑफ बडोदा, शाखा एम.जी. रोड, नाशिक | १३/०५/२०२४ | १ वर्ष | ७.६५% | ४९,४०,५७,०००/- |
| ४१ | पंजाब नॅशनल बँक, शाखा शरणपुर रोड, नाशिक | २९/०५/२०२४ | ९१ दिवस | ७.३१% | १०९,१३,७९,०१४/- |
| ४२ | पंजाब नॅशनल बँक, शाखा शरणपुर रोड, नाशिक | २९/०५/२०२४ | ९१ दिवस | ७.३१% | १०९,१३,७९,०१४/- |
| ४३ | पंजाब नॅशनल बँक, शाखा शरणपुर रोड, नाशिक | ०७/०६/२०२४ | ३० दिवस | ७.३१% | ४५,६१,८९,५८९/- |
| **ड)** | **बँक ऑफ बडोदा, शाखा आर.के., नाशिक खाते क्र. ९७५८०१०००४०९४२ येथुन करण्यात आलेल्या मुदतठेव गुंतवणुका** | **गुंतवणुक दिनांक** | **मुदत** | **व्याजदर** | **रक्कम रुपये लक्ष** |
| ४४ | कॅनरा बँक, गंगापुर रोड, नाशिक | २२/०३/२०२४ | ६० दिवस | ७.६५% | २,१०,००,०००/- |
| ४५ | पंजाब नॅशनल बँक, शाखा शरणपुर रोड, नाशिक | २१/०५/२०२४ | ६० दिवस | ६.४०% | २,१२,६४,०८२/- |
| **इ)** | **बँक ऑफ बडोदा, शाखा आर.के., नाशिक खाते क्र. ९७६२०१०००१७६५८ येथुन करण्यात आलेल्या मुदतठेव गुंतवणुका** | **गुंतवणुक दिनांक** | **मुदत** | **व्याजदर** | **रक्कम रुपये लक्ष** |
| ४६ | कॅनरा बँक, गंगापुर रोड, नाशिक | ०८/०४/२०२४ | ६० दिवस | ७.००% | ७,०१,८२,०[illegible]/- |
| ४७ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | ०८/०५/२०२४ | ६० दिवस | ६.९५% | ३५,००,००,०००/- |
| ४८ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | ०८/०५/२०२४ | ३० दिवस | ६.६०% | ७,०९,८९,५७४/- |

वरील प्रमाणे गुंतवणुक माहितीस्तव तथा मान्यतेस्वत सविनय सादर.

**ठराव क्र.१४ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या दिनांक ०१/०९/२०२३ ते ३०/०६/२०२४ या कालावधीत केलेल्या मुदत ठेव गुंतवणुक / फेर गुंतवणुकीच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.१५:- संवैधानिक लेखापरीक्षकाचे सन २०२३-२४ साठी A.G. ने निश्चित केलेले लेखापरिक्षण शुल्क मान्य करणेबाबत.**

काम्प्ट्रोलर अँड ऑडीटर जनरल नवी दिल्ली यांचे कडील पत्र क्र.CA.V/COY /MAHARASHTRA /SHABARI (१)/१७९१ दिनांक २२.०९.२०२३ अन्वये पटेल कलंत्री अँण्ड असोसिएट्स, सनदी लेखापाल, नाशिक (WR0477) यांची शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या आर्थिक वर्ष २०२३-२४ या वर्षाच्या लेख्यांचे लेखापरिक्षणाकरीता संवैधानिक लेखा परिक्षक (Statutory Auditor) म्हणून नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

कम्प्ट्रोलर अँड ऑडीटर जनरल नवी दिल्ली यांचे कडील पत्र क्र. CA.V/COY /MAHARASHTRA /SHABARI (१)/१७९१ दिनांक २२.०९.२०२३ मधील ANNEXURE - II नुसार सन २०२३-२४ साठी लेखापरिक्षण शुल्क रक्कम रु.२,१५,७६३/- नमुद करण्यात आलेले आहेत. सदर रक्कम विचारात घेवून लेखापरीक्षण शुल्क खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

रक्कम (रु.)

| अ.क्र. | तपशिल | सन २०२३-२४ |
|---|---|---|
| १ | लेखापरीक्षण | २,१५,७६३/- |
| २ | अधिक - १५% टॅक्स ऑडीटची रक्कम रु. | ३२,३६४/- |
| ३ | **एकूण (१+२)** | **२,४८,१२७/-** |
| ४ | अधिक - ९% सी.जी.एस.टी. रक्कम रु. | २२,३३१/- |
| ५ | अधिक - ९% एस.जी.एस.टी. रक्कम रु. | २२,३३१/- |
| | **एकूण रु. (३+४+५)** | **२,९२,७८९/-** |

जी.एस.टी. रक्कम व टॅक्स ऑडीटची रक्कम सध्याच्या प्रचलित दरानुसार नमुद केलेली आहे. सदरच्या दरामध्ये वेळोवेळी होणा-या बदलानुसार, त्या वेळीच्या प्रचलित दरानुसार जी.एस.टी. ची रक्कम व टॅक्स ऑडीटची रक्कम संवैधानिक लेखापरिक्षक यांना अदा करावी लागेल. तसेच सदरच्या रकमेतुन नियमानुसार आयकर कपात करण्यात येईल.

तसेच वरील प्रमाणे नमुद लेखा परिक्षण शुल्क व्यतिरिक्त संवैधानिक लेखापरिक्षक व त्यांचे सहाय्यकांचा प्रवास खर्च, स्थानिक प्रवास खर्च स्टेशनरी खर्च, निवास खर्च, चहापाणी व अल्पोपहार खर्च, भोजन खर्च इ. खर्च यापुर्वी प्रमाणेच महामंडळाकडून करण्यांत येईल. लेखापरीक्षकांचा स्थानिक प्रवास खर्च, स्टेशनरी खर्च, निवास खर्च, चहापाणी व अल्पोपहार खर्च इ. खर्च संवैधानिक लेखापरिक्षणासाठी करण्यांस संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

उपरोक्त प्रमाणे सन २०२३-२४ साठी एकुण रु. २,९२,७८९/- (अक्षरी दोन लक्ष ब्याणव हजार सातशे एकोणनव्वद रुपये मात्र) चे लेखापरीक्षण शुल्क संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर.

**ठराव क्र. १५ :- काम्प्ट्रोलर अँड ऑडीटर जनरल, नवी दिल्ली यांनी नेमणुक केलेले पटेल कलंत्री अँण्ड असोसिएट्स, सनदी लेखापाल, नाशिक (WR0477) या संवैधानिक लेखापरिक्षकाच्या सन २०२३-२४ साठी रु. २,९२,७८९/- (अक्षरी दोन लक्ष ब्याणव हजार सातशे एकोणनव्वद रुपये मात्र) चे लेखापरीक्षण शुल्क व लेखापरीक्षकांचा स्थानिक प्रवास खर्च, स्टेशनरी खर्च, निवास खर्च, चहापाणी व अल्पोपहार खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.१६ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडुन कर्ज वाटपासाठी प्राप्त होणारा निधी तसेच सदरच्या निधीचे प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या खात्यात थेट कर्ज वाटप करणे यासाठी उघडण्यात आलेल्या बँक ऑफ बडोदा, शाखा - आर.के., नाशिक येथील खात्यास मान्यता मिळणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने खालील बाबींसाठी बँक ऑफ बडोदा, शाखा - आर.के., नाशिक येथे स्वतंत्र खाते उघडण्यात आलेले आहे.

१) शबरी महामंडळास एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडुन कर्ज वाटपासाठी प्राप्त होणारा निधी नवीन बँक खात्यात ठेवणे.

२) सदरच्या कर्जाची रक्कम प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या खात्यात थेट वर्ग करणे.

३) कर्ज वाटपानंतर लाभार्थ्यांकडुन होणारी कर्ज वसुलीची रक्कम महिनाअखेरपर्यंत सदरच्या खात्यात जमा ठेवुन पुढील महिन्याच्या १ ते १० तारखेपर्यंत सदरची रक्कम एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना वर्ग करणे.

उपरोक्त बाबींच्या पुर्ततेसाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने बँक ऑफ बडोदा, शाखा - आर. के. नाशिक येथे **शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादीत, नाशिक** या नावाने नवीन बचत खाते उघडण्यात आलेले आहे.

बँकेचे नाव :- बँक ऑफ बडोदा, शाखा - आर. के. नाशिक

सेव्हिंग खाते क्र. 97580100040942

IFSC Code - BARB0DBRAVI

(Fifth character is zero)

उपरोक्त प्रमाणे बँक ऑफ बडोदा, शाखा - आर.के., नाशिक या बँकेत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, नाशिक यांचे उघडण्यात आलेल्या बचत खात्याच्या कार्यवाहीस मंजुरी मिळावी.

बँक ऑफ बडोदा, शाखा - आर.के., नाशिक यांचे पत्र क्र.BOB / DBRAVI / २०२३-२०२४ दिनांक २५/१०/२०२३ नुसार बँकेने खाते क्र. 97580100040942 याऐवजी खाते क्र. 97620100017658 यावर Baroda Cash Management Facility Service (BOB CMS) activate करण्यात आलेले असल्याचे महामंडळास कळविलेले आहे.

त्यामुळे बँक ऑफ बडोदा येथे शबरी महामंडळाची २% व्यवस्थापन खर्च रक्कम ठेवण्यासाठी उघडण्यात आलेले खाते क्र. 97620100017658 हे यापुढे एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडुन प्राप्त होणारा निधी, थेट कर्जवाटप या कारणांसाठी वापरण्याचे मंजुरीस्तव सादर.

तसेच बँक ऑफ बडोदा येथे उघडण्यात आलेले खाते क्र. 97580100040942 हे शबरी महामंडळाची २% व्यवस्थापन खर्च रक्कम ठेवण्यासाठी वापरण्याचे मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र.१६ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडुन कर्ज वाटपासाठी प्राप्त होणारा निधी तसेच सदरच्या निधीचे प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या खात्यात थेट कर्ज वाटप करणे यासाठी उघडण्यात आलेल्या बँक ऑफ बडोदा, शाखा - आर.के., नाशिक येथे उघडण्यात आलेले खाते क्र. 97580100040942 यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.१७ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय व शाखा कार्यालय स्तरावरील प्रलंबित मुद्दे हे सन २०२२-२३ च्या लेख्यांमध्ये Write Off केल्याच्या कार्यवाहीस मंजुरी मिळणेबाबत.**

शबरी महामंडळाचे शाखा कार्यालय व मुख्य कार्यालय येथील प्रलंबित बाबींचा निपटारा करणेकामी मुख्य कार्यालय व सर्व शाखा कार्यालय यांचे ठिकाणी असलेल्या दप्तरांची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, सदरचे मुद्दे हे सन १९९९-२००० पासुन पुढील कालावधीचे प्रलंबित असून ते निकाली काढणेकामी आवश्यक ते रेकॉर्ड / तपशिल उपलब्ध होत नसल्याने सदरच्या प्रलंबित मुद्यांचा निपटारा आजपर्यंत करण्यात आलेला नाही.

लेख्यांमध्ये सुसुत्रता आणणेकामी सदरच्या मुद्यांचा निपटारा होणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात सदरच्या रकमांची अदायगी यापुर्वीच झालेली आहे किंवा झालेली नाही. मात्र तत्कालीन लेखा शाखेने नोंदी अचुक न घेतल्याने सदरच्या रकमा देय / येणे दिसत आहे.

मा.प्रधान महालेखाकार कार्यालय, मुंबई यांचेकडून लेखापरिक्षण होतांना या मुद्यांबाबत सारखी विचारणा होते. सदरचे मुद्दे निकाली निघत नसतील तर त्यांना Write Off करुन घेण्यात यावे, असे मा.प्रधान महालेखाकार कार्यालय, मुंबई यांचेकडूनही मौखीकरीत्या सांगण्यात आलेले आहे. तसेच सन २०२२-२३ चे संवैधानिक लेखापरिक्षक पटेल कलंत्री अँण्ड असोसिएटस, सनदी लेखापाल, नाशिक (WR०४७७) यांचेकडूनही सदरील मुद्दे निकाली काढुन सन २०२२-२३ च्या वार्षीक लेख्यांमध्ये आवश्यक तो बदल करुन घेण्यात यावा, असे मौखीकरीत्या सांगण्यात आलेले आहे.

उपरोक्त प्रमाणे Write Off संबंधिच्या लेखा नोंदी लेखा पुस्तकात दिनांक ३१/०३/२०२३ रोजी करण्यात आलेल्या आहेत. सोबत मुख्य कार्यालय व शाखा कार्यालय यांच्या Write Off करण्यात आलेल्या याद्या सोबत जोडण्यात आलेल्या आहेत. भविष्यात सदरच्या रकमांचा मेळ लागल्यानंतर त्याची योग्य ती नोंद हिशोबी पुस्तकात घेण्यात येईल.

करीता सोबत जोडलेल्या नावे मुद्यांचे / नावे प्रलंबित व्यवहारांची नोंद ही नफा - तोटा खात्यास नावे बाजुला ( P & L Accounts - Debit Side) Miscellaneous Expenses या लेखाशिर्षाखाली रक्कम रु. १,१३,९९,३५९/- दाखविण्याचे तसेच जमा मुद्यांचे / जमा प्रलंबित व्यवहारांची नोंद ही नफा - तोटा खात्यास जमा बाजुला ( P & L Accounts - Credit Side) Miscellaneous Income या लेखाशिर्षाखाली रक्कम रु. २,१०,५६,४२४/- दाखवुन समायोजन केल्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी मिळणेस विनंती.

**ठराव क्र.१७ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय व शाखा कार्यालय स्तरावरील प्रलंबित मुद्दे हे सन २०२२-२३ च्या लेख्यांमध्ये Write Off केल्याच्या कार्यवाहीस सभेकडून मंजुरी देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र. १८ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत सन २०१९-२० पासुन सुरु झालेल्या केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी गुंतवणुक करुन त्यावर प्राप्त होणारे व्याज हे सन २०२२-२३ मध्ये शबरी महामंडळाचा नफा म्हणुन दर्शविणेच्या केलेल्या कार्यवाहीस मंजुरी मिळणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने "नवीन योजनांसाठी प्राप्त झालेला निधी गुंतवणुक करुन त्यावर प्राप्त झालेले व्याज हे महामंडळाचा नफा म्हणुन न दाखवता हा योजनानिहाय मिळालेले व्याज म्हणुन दाखविण्यात यावे" सन २०१९-२०, सन २०२०-२१, सन २०२१-२२ व सन २०२२-२३ चे लेखे अंतिम करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | व्याज रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | २०१९-२० | १,२५,३८,००६.३४ |
| २ | २०२०-२१ | ४,३०,२४,७१८.८४ |
| ३ | २०२१-२२ | ७,२९,३१,९६०.०० |
| ४ | २०२२-२३ | ६,१५,४१,८८४.०० |
| **५** | **एकुण व्याज** | **१९,००,३६,५६९.१८** |

| | | |
|---|---|---|
| ६ | सन २०२२-२३ च्या लेख्यांमध्ये Income म्हणुन दर्शविण्यात आलेली रक्कम रु.<br>१. वनधन योजना रु. १,८८,२४,४९६/-<br>२. मा. आयुक्त कार्यालयाच्या SNA खात्यात SCA योजनेचा वर्ग करण्यात आलेल्या निधीवरील व्याजाची रक्कम रु. १०,५३,९५,१९८/-<br>३. मा. आयुक्त कार्यालयाच्या SNA खात्यात PVTG योजनेचा वर्ग करण्यात आलेल्या निधीवरील व्याजाची रक्कम रु. ५३,२७,७६२/- | -१२,९५,४७,४५६.०० |
| ७ | **दिनांक ३१/०३/२०२३ अखेर शिल्लक असलेली व्याजाची रक्कम रु.** | **६,०४,८९,११३.००** |

AG Provisional Comments Letter dated ३०/११/२०२३ F.Y.२०२०-२१ मधील मुद्दा क्र.II.Other Income (Note No.A-२१) Rs.१२.५५ Crore व AG Provisional Comments Letter dated ३०/११/२०२३ F.Y.२०२१-२२ मधील मुद्दा क्र.II.Other Income (Note No.A-२१) Rs.१६.४२ Crore नुसार मा.प्रधान महालेखाकार कार्यालय, मुंबई यांनी सादर केलेल्या AG Provisional Comments मध्ये "नवीन योजनांसाठी प्राप्त झालेला निधी गुंतवणुक करुन प्राप्त होणारे व्याज हे संबंधित योजनेला जमा घेण्याच्या पद्धतीस" आक्षेप घेण्यात आलेला आहे.

सदरच्या मुद्यांनुसार सन २०१९-२० ते सन २०२१-२२ या कालावधीत योजनानिहाय व्याज जमा दाखविणे ही पद्धत चुकीची असुन The interest earned as above is Company's income and its accounting as a grant under Other Current Liabilities is incorrect असे नमुद केलेले आहे.

सदरच्या मुद्यावर शबरी महामंडळाचे कर सल्लागार ए.वाय.जी. अँड असोसिएट, सनदी लेखापाल, नाशिक यांचेशी शआविविम/वित्त/४३८/२०२४ दिनांक १८/०३/२०२४ नुसार पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने ए.वाय.जी. अँड असोसिएट, सनदी लेखापाल, नाशिक यांनी दिनांक २९/०४/२०२४ रोजीच्या पत्रानुसार It is possible to take the view that interest income on the grants can be trated as income in absence of specific mention of re-investment of interest income in the grants असे कळविलेले आहे.

सन २०१९-२० पासुन सन २०२२-२३ पर्यंतच्या लेख्यांमध्ये योजनांना जमा दर्शविण्यात आलेली रक्कम रु. ६,०४,८९,११३/- ही सन २०२२-२३ च्या आर्थिक लेख्यांमध्ये नफा म्हणुन दर्शविण्यात आलेली आहे.

करीता "नवीन योजनांसाठी प्राप्त झालेला निधी गुंतवणुक करुन त्यावर प्राप्त झालेले व्याज हे महामंडळाचा नफा म्हणुन दर्शविण्यात येईल" सदरची ठरविण्यात आलेली Accounting Policy मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र.१८ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत सन २०१९-२० पासुन सुरु झालेल्या केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी गुंतवणुक करुन त्यावर प्राप्त होणारे व्याज हे सन २०२२-२३ मध्ये शबरी महामंडळाचा नफा म्हणुन दर्शविणेच्या केलेल्या कार्यवाहीस सभेकडून मंजुरी देण्यात येत आहे. तसेच यापुढील वर्षाच्या लेख्यांमध्ये "नवीन योजनांसाठी प्राप्त झालेला निधी गुंतवणुक करुन त्यावर प्राप्त झालेले व्याज हे महामंडळाचा नफा म्हणुन दर्शविण्यात येईल" सदरची ठरविण्यात आलेल्या Accounting Policy बाबत सभेकडून मंजुरी देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.१९:- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२२-२३ चे अंतिम लेखे व लेखापरिक्षण अहवालास मंजुरी देणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२२-२३ च्या लेख्यांना दिनांक २६/०९/२०२३ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेतील आयत्या वेळेचा ठराव क्र.२ नुसार मंजुरी प्राप्त झालेली आहे. संचालक मंडळाच्या मान्यतेनंतर मा.महालेखापाल कार्यालय, नवी दिल्ली यांचेकडून नियुक्त करण्यात आलेल्या पटेल कलंत्री अँण्ड असोसिएट्स, सनदी लेखापाल, नाशिक (WR0477) यांचेकडे सदरचे सन २०२२-२३ चे अंतिम लेखे लेखापरिक्षणासाठी पाठविण्यात आलेले होते. त्यामधील ठळक बाबी खालील प्रमाणे नमुद करण्यात आलेल्या होत्या.

(रुपये लक्ष)

| अ.क्र | तपशिल | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|
| १ | भागभांडवल | ८७११.२१ | ८८१२.१८ |
| २ | भाग आवेदन रक्कम प्रलंबित वाटप (Share Application Money Pending Allotment) | १००.९७ | ०.०० |
| ३ | उलाढाल | ६९५.२८ | २०९७.०२ |
| ४ | नक्त संपत्ती (Net Worth) | १२७७८.३९ | १४५३३.१८ |
| ५ | राखीव निधी (Reserve & Surplus) | १५२२.३५ | ३१७६.१७ |
| ६ | कर्ज देणे (NSTFDC, New Delhi Outstanding) | १२३२.४९ | १५८४.०९ |
| ७ | कर्ज येणे (Loans to Beneficiaries) | ९६१२.८२ | १०२६२.४१ |
| ८ | गुंतवणुक व बॅक शिल्लक | २४७५९.१९ | १२७८०.११ |
| ९ | स्थायी मालमत्ता | २८.७६ | ३९.५६ |
| १० | नफा | ३८९.४६ | १६५३.८२ |

उपरोक्त सन २०२२-२३ चे संवैधानिक लेखापरिक्षणाचे वेळेस संवैधानिक लेखापरिक्षक यांचेकडून सदरच्या लेख्यांमध्ये काही सुधारणा / दुरुस्ती करणेबाबत समक्ष निदेश देण्यात आलेले होते. त्यानुसार उचित कार्यवाही करण्यात येवुन अंतिम लेखे तयार करण्यात आलेले आहे. त्यामधील ठळक बाबी खालील प्रमाणे आहेत.

(रुपये लक्ष)

| अ.क्र | तपशिल | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|
| १ | भागभांडवल | ८७११.२१ | ८८१२.१८ |
| २ | भाग आवेदन रक्कम प्रलंबित वाटप (Share Application Money Pending Allotment) | १००.९७ | ०.०० |
| ३ | उलाढाल | ६९५.२८ | २५८६.७५ |
| ४ | नक्त संपत्ती (Net Worth) | १२७७८.३९ | १५२३४.६४ |
| ५ | राखीव निधी (Reserve & Surplus) | १५२२.३५ | ३८७७.६३ |
| ६ | कर्ज देणे (NSTFDC, New Delhi Outstanding) | १२३२.४९ | १५८४.०९ |
| ७ | कर्ज येणे (Loans to Beneficiaries) | ९६१२.८२ | १०२६२.४१ |
| ८ | गुंतवणुक व बॅक शिल्लक | २४७५९.१९ | १२७८०.११ |
| ९ | स्थायी मालमत्ता | २८.७६ | ३९.५६ |
| १० | नफा | ३८९.४६ | २३५५.२८ |

त्यानुसार अंतिम लेखे व उपरोक्त तक्यातील नमुद बाबीस संचालक मंडळाची मान्यता मिळणेस विनंती. सन २०२२-२३ चे संवैधानिक लेखापरिक्षक पटेल कलंत्री अँण्ड असोसिएट्स, सनदी लेखापाल, नाशिक (WR0477) यांचेकडुन लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झालेला आहे. सोबत छायाप्रत जोडलेली आहे. सदरच्या लेखापरिक्षण अहवालास मान्यतेनंतर मा.महालेखापाल कार्यालय, मुंबई यांना अंतिम लेखापरिक्षण करणेकरीता सादर करण्याचे मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र.१९ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२२-२३ चे अंतिम लेखे व लेखापरिक्षण अहवालास सभेकडून मंजुरी देण्यात येत आहे. सदरील सन २०२२-२३ चा लेखापरिक्षण अहवाल हा अंतिम लेखापरिक्षण करणेसाठी मा.महालेखापाल कार्यालय, मुंबई यांना पाठविण्यास सभेकडून मंजुरी देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.२०:-शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२३-२४ चे प्रारुप अंतिम लेख्यास मंजुरी देणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२३-२४ चे लेखे तयार केलेले असुन सदरच्या अहवाल वर्षातील ठळक बाबी खालील प्रमाणे आहेत.

(रुपये लक्ष)

| अ.क्र | तपशिल | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|
| १ | भागभांडवल | ८८१२.१८ | ८८१२.१८ |
| २ | भाग आवेदन रक्कम प्रलंबित वाटप (Share Application Money Pending Allotment) | ०.०० | १८४०.८४ |
| ३ | उलाढाल | २५८६.७५ | २४२२.०८ |
| ४ | नक्त संपत्ती (Net Worth) | १५२३४.६४ | |
| ५ | राखीव निधी (Reserve & Surplus) | ३८७७.६३ | ८१८४.९३ |
| ६ | कर्ज देणे (NSTFDC, New Delhi Outstanding) | १५८४.०९ | ३८६५.४८ |
| ७ | कर्ज येणे (Loans to Beneficiaries) | १०२६२.४१ | १२६७४.५६ |
| ८ | गुंतवणुक व बँक शिल्लक | १२७८०.११ | २३६०८.८४ |
| ९ | स्थायी मालमत्ता | ३९.५६ | ४२.९७ |
| १० | नफा | २३५५.२८ | १८४३.९४ |

अहवाल वर्षात शबरी महामंडळास रु.१८४३.९४ लक्ष इतका संभाव्य निव्वळ नफा झालेला आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२३-२४ चे अंतिम लेखे संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर. संचालक मंडळाच्या मान्यतेनंतर मा.महालेखापाल कार्यालय, नवी दिल्ली यांचेकडून नियुक्त करण्यात आलेल्या पटेल कलंत्री अँण्ड असोसिएट्स, सनदी लेखापाल, नाशिक (WR0477) यांचेकडे सदरचे अंतिम लेखे लेखापरिक्षणासाठी पाठविण्यास सभेकडुन मंजुरी मिळणेस विनंती.

**ठराव क्र.२० :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या सन २०२३ - २४ या आर्थिक वर्षाच्या अंतिम लेख्यास सभेकडून मंजुरी देण्यात येत आहे व सदरचे अंतिम लेखे महामंडळाचे संवैधानिक लेखापरीक्षक पटेल कलंत्री अँण्ड असोसिएट्स, सनदी लेखापाल, नाशिक (WR0477) यांचेकडे लेखापरीक्षणासाठी पाठविण्यास सभेकडून मंजुरी देण्यात येत आहे.**

सुचक :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
अनुमोदक :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.२१:- शासन निर्णय दिनांक २२/११/२०२३ नुसार महामंडळे यांचेकडील अतिरीक्त निधी गुंतवणुकीसाठी व्याजदर मागविणेसाठी खाजगी बँकांच्या निश्चीत करण्यात आलेल्या यादीस मान्यता मिळणेबात.**

दिनांक २८/०६/२००६ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या सभेतील ठराव क्र.५ नुसार महामंडळाकडुन करण्यात येणा-या गुंतवणुकीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

त्यानुसार महामंडळाच्या अटी व शर्ती ज्या राष्ट्रीयकृत बँकाना मंजुर असतील त्याचे कडुन लेखी पत्र घेवुन गुंतवणुक करण्यासाठी महामंडळाच्या पॅनलमध्ये समावेश करुन कार्यवाही करण्यात येत आहे.

शासन निर्णय क्र.सकीर्ण २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा ५ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २२/११/२०२३ नुसार रु.१६,०००/- कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या खाजगी बँका (अनुसुचीत वाणिज्यिक बँका) आणि नक्त मूल्य रु.४०००/- कोटी पेक्षा जास्त असल्यास महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई या बँकांना शासकीय कार्यालयांच्या बँकींग विषयक व्यवहारांसाठी आणि सार्वजनिक उपक्रम / महामंडळे यांचेकडील अतिरीक्त निधी गुंतविण्यासाठी खालील तपशिलाप्रमाणे बँकांची सूची देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | बँकेचे नाव |
|---|---|
| १ | एचडीएफसी बँक |
| २ | आयसीआयसीआय बँक |
| ३ | एक्सीस बँक |
| ४ | कोटक महिंद्रा बँक |
| ५ | इंडसइंड बँक |
| ६ | येस बँक |
| ७ | आयडीएफसी फर्स्ट बँक |
| ८ | फेडरल बँक |
| ९ | बंधन बँक |

त्यानुसार राष्ट्रीयकृत बँकांसह उपरोक्त ९ खाजगी बँका यांचेकडुन मुदतठेव पावतीमध्ये गुंतवणुक करणेसाठी दरपत्रके मागविण्याचे तथा मान्यतेस सादर.

**ठराव क्र.२१ :- शासन निर्णय क्र.सकीर्ण २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा ५ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई दि.२२/११/२०२३ नुसार रु.१६,०००/- कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या खाजगी बँका (अनुसुचीत वाणिज्यिक बँका) आणि नक्त मूल्य रु.४०००/- कोटी पेक्षा जास्त असल्यास महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई या बँकांना शासकीय कार्यालयांच्या बँकींग विषयक व्यवहारांसाठी आणि सार्वजनिक उपक्रम / महामंडळे यांचेकडील अतिरीक्त निधी गुंतविण्यासाठी बँकांच्या निश्चित करण्यात आलेल्या सूचीमध्ये समाविष्ट असलेल्या बँकांकडे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळमार्फत मुदतठेव पावतीमध्ये गुंतवणुक करणेसाठी दरपत्रके मागवुन गुंतवणुक करण्यास सभेकडून मंजुरी देण्यात येत आहे.**

सुचक :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
अनुमोदक :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.२२- ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म व सोशल मिडीया मार्केटिंग करीता प्राप्त भागभांडवलामधून खर्च करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत आदिवासी समाज बांधवांच्या शेतकरी उत्पादक कंपनी, वनधन विकास केंद्र, बचतगट, ग्रामसभा, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेतून उत्पादित मालावर प्रक्रीया व विक्री करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना मोठी बाजारपेठ मिळावी व उत्पादित मालाला योग्य भाव मिळावा यासाठी ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म द्वारे विक्री करण्यासाठी ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म व सोशल मिडीया मार्केटिंग प्लॅटफॉर्म तयार करावयाचे आहे.

महामंडळाला राज्य शानाकडून भागभांडवलापोटी संगणक वेबसाईट खर्च करीता सन २००८-०९ मध्ये प्राप्त झालेल्या निधीतून शिल्लक रक्कम रुपये १३,०८,५५०/- व सन २०१८-१९ मधील रक्कम रुपये ५.०० लक्ष असे एकूण शिल्लक रक्कम रु.१८,०८,५५०/- उपलब्ध आहे. विहित कार्यपद्धतींचा अवलंब करुन रु.२०.०० लक्ष पर्यंत उपरोक्त बाबीसाठी खर्च करण्याचे मान्यतेस सादर.

सदरील विषय सभेचे मान्यतेस्तव मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केलेला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.२२ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाला राज्य शानाकडून भागभांडवलापोटी संगणक वेबसाईट खर्च करीता सन २००८-०९ मध्ये प्राप्त झालेल्या निधीतून शिल्लक रक्कम रुपये १३,०८,५५०/- व सन २०१८-१९ मधील रक्कम रुपये ५.०० लक्ष असे एकूण शिल्लक रक्कम रु.१८,०८,५५०/- उपलब्ध निधीतून ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म व सोशल मिडीया मार्केटिंग करीता विहित कार्यपद्धतींचा अवलंब करुन रु.२०.०० लक्ष पर्यंत उपरोक्त बाबीसाठी खर्च करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.तसेच आदिवासी बांधवांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांची विक्री "Shabari Naturals" या नावाने करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

## आयत्या वेळेचे विषय

**आयत्या वेळेचा विषय क्र.१:- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या भाग भांडवल रक्कम रु.१८४०.८४ लक्षचे भाग भांडवल प्रमाणपत्र राज्य शासनास देणे बाबत.**

शासन निर्णय क्र.आविम-२००४/प्र.क्र.१५/ का.३ दि.२४ ऑगस्ट, २००४ नुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु.१०० कोटी वरुन रु.२०० कोटी इतके करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

यापैकी ५१% भाग भांडवल वर्गणी राज्य शासनाची राहिल तर ४९% भाग भांडवल केंद्र शासनाकडून उभारावयाचे आहे. त्या अनुसारं राज्य शासनाने रु.१०२ कोटी तर केंद्र शासनाने रु. ९८ कोटी इतके भाग भांडवल भरणा करावयाचे आहे.

उपरोक्त निर्णयानुसार आज अखेर पर्यंतची अंदाजपत्रकात केलेली मागणी, शासन तरतूद, महामंडळास प्राप्त रक्कम व कमी प्राप्त भागभांडवलाचा तपशिल खालील प्रमाणे.

(रुपये लाखात)

| सन | ५१% राज्य शासन हिस्सा | | | | ४९% केंद्र शासन हिस्सा | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शासन निर्णयानुसार केलेली अंदाजपत्रकिय मागणी | शासनाने केलेली तरतूद | **महामंडळास प्राप्त रक्कम** | कमी प्राप्त रक्कम | शासन निर्णयानुसार केलेली अंदाजपत्रकिय मागणी | शासनाने केलेली तरतूद | **महामंडळास प्राप्त रक्कम** | कमी प्राप्त रक्कम | **महामंडळास एकुण प्राप्त रक्कम** |
| १९९८-१९९९ | ५००.०० | ५००.०० | ५००.०० | - | - | - | - | - | ५००.०० |
| १९९९-२००० | १०००.०० | १०००.०० | १०००.०० | - | - | - | - | - | १०००.०० |
| २०००-२००१ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| २००१-२००२ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| २-२००३ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| २००३-२००४ | ७१७.१६ | ७१७.१६ | ७१७.१६ | - | ५२.०० | ५२.०० | ५२.०० | - | ७६९.१६ |
| २००४-२००५ | २०००.०० | ११०.०० | ११०.०० | १८९० | १०५.०० | - | - | १०५.०० | ११०.०० |
| २००५-२००६ | ३८९०.०० | २५०.०० | - | ३८९० | - | - | - | - | - |
| २००६-२००७ | ५८९०.०० | ३७७.३२ | ५०.०० | ५८४० | १५३.०० | - | - | १५३.०० | ५०.०० |
| २००७-२००८ | ७८४०.०० | ४००.०० | ४००.०० | ७४४० | ३८४.०० | - | - | ३८४.०० | ४००.०० |
| २००८-२००९ | ४६.०० | ०.०० | ४६.०० | ७४४० | ३८४.०० | - | - | ३८४.०० | ४६.०० |
| २००९-२०१० | ४००.०० | ४००.०० | ४००.०० | ११५० | - | - | - | - | ४०० |
| २०१०-२०११ | २६५०.०० | १५००.०० | १५००.०० | १५० | - | - | - | - | १५००.०० |
| २०११-२०१२ | १०००.०० | ८५०.०० | ८५०.०० | १५० | - | ३००.०० | ३००.०० | - | ११५०.०० |
| २०१२-२०१३ | २२९६.०० | १०००.०० | ८००.०० | - | ४५२७.०० | - | - | ४५२७.०० | ८००.०० |
| २०१३-२०१४ | १०००.०० | १०००.०० | ४११.०० | ५८९.०० | १०००.०० | - | - | १०००.०० | ४११.०० |
| २०१४-२०१५ | १०००.०० | १०००.०० | ५७५.०० | ४२५.०० | १०००.०० | - | - | - | - |
| ५-२०१६ | - | १०००.०० | ००.०० | - | - | | ००.०० | | ००.०० |
| २०१६-२०१७ | १०००.०० | १०००.०० | - | | | - | | - | - |
| २०१७-२०१८ | १०००.०० | १०००.०० | - | - | ६७.१८ | - | - | - | - |
| २०१८-२०१९ | १०००.०० | १०००.०० | १०००.०० | - | - | - | - | - | - |
| २०१९-२०२० | १०००.०० | १०००.०० | - | - | - | - | १००.९७ | - | १००.९७ |
| २०२०-२०२१ | १०००.०० | १०००.०० | - | - | - | - | - | - | - |
| २०२१-२०२२ | ५००.०० | ५००.०० | - | - | - | - | - | - | - |
| २०२२-२०२३ | ५००.०० | - | - | - | - | - | - | - | - |
| २०२३-२०२४ | | | १८४०.८४ | | | | | | |
| **एकूण प्राप्त भागभांडवल :-** | | | **१०२००.००** | | - | - | **४५२.९७** | | **८८१२.१३** |

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास राज्य शासनाकडून प्राप्त सन २०२३-२४ करीता प्राप्त झालेल्या भागभांडवल रक्कम रु.१८४०.८४ लक्षचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | शासन निर्णय क्रमांक | राज्य शासन रु.लक्ष |
|---|---|---|
| १ | शासन निर्णय क्रमांक-बीयुडी-२०२३/प्र.क्र.०५/कार्यासन ६ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२७ मार्च, २०२४ | १८४०.८४ |
| | एकूण | १८४०.८४ |

वरील प्रमाणे राज्य शासनाकडून शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास रु.१८४०.८४ लक्ष इतकी भाग भांडवल रक्कम प्राप्त झालेली आहे. सदर प्राप्त झालेल्या भाग भांडवलामधूनशासन पत्र क्र.Comp.No.-७६१६१९ File No.-MTD-२४०२६/७/२०२४-MTD (Desk ३) मंत्रालय, मुंबई दि.२३/०४/२०२४ अन्वये कळविल्यानुसार रक्कम रु.७५.०० लक्ष समायोजित करण्यांत येत असुन उर्वरित रक्कम रु.१७६५.८४ रकमेचे भाग भांडवल प्रमाणपत्र (Share Certificate) राज्य शासनास पाठविणेस मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**आयत्या वेळेचा ठराव क्र.१ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या भाग भांडवल रक्कम रु.१८४०.८४ लक्ष रकमेतून बिरसा मुंडा आदिवासी सहकारी सुतगिरणीस शासकीय भागभांडवलापोटी देण्यांत आलेली रक्कम रु.७५.०० लक्ष समायोजित करुन उर्वरित रक्कम रु.१७६५.८४ रकमेचे भाग भांडवल प्रमाणपत्र राज्यशासनास देण्यासंबंधी मा.व्यवस्थापकीय संचालक यांना पुढील योग्य ते सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार देण्यांत येत आहे.**

**सुचक :-** मा.आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक

**अनुमोदक :-** मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक.

**आयत्या वेळेचा विषय क्र.२:- FPO / वनधन यांचेमार्फत उत्पादित होणाऱ्या वस्तूंचे प्रचार प्रसिद्धी करणेकामी शबरी महामंडळाचे स्टॉल लावण्यासाठी होणारा खर्च महामंडळास तसेच इतर आवश्यक प्रचार प्रसिद्धी करीता विविध योजनांमधुन प्राप्त होणाऱ्या २% प्रशासकीय खर्चातून खर्च करण्यांस मान्यता मिळणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ जन जल जंगल व जमीन याद्वारे आदिवासीचे सक्षमीकरण करणे हा उद्देश घेवून विविध उपक्रम राबवित आहेत. जसे Organizing FPOs of 15000 Farmers for Processing, Distribution, Branding and Retailing, मोहफुल, आमचूर ,वनधन योजना यासारखे विविध प्रकल्प राबविण्यात येतात.

सद्यस्थिती मध्ये ९५ शेतकरी उत्पादक संस्था, प्रधान मंत्री वनधन योजने अंतर्गत २६४ वनधन केंद्र, पीएम जन मन योजने अंतर्गत ४० pvtg वनधन केंद्र, मानव विकास कार्यक्रम अंतर्गत मोहावर आधारित १२ वन धन केंद्र तसेच आमचूर वर आधारित १० वनधन केंद्र/ प्रभाग संघ यांना शबरी शबरी आदिवासी वित्त विकास महामंडळ मर्या. नाशिक मार्फत आर्थिक सहाय्य करण्यात आले आहे. सदर प्रकल्या अंतर्गत वनधन केंद्र तसेच शेतकरी उत्पादक संस्थे मार्फत विवध प्रकारचे उपजीविकेचे उत्पादने तयार करुन Packaging, Branding & Marketing करून विक्री करतात.

त्याअनुषंगाने महाराष्ट्रात वेगवेगळया ठिकाणी आयोजित होणाऱ्या जनजागृती कार्यक्रम, शिबिरांमध्ये शबरी महामंडळाअंतर्गत स्थापन झालेले FPO / वनधन यांचेमार्फत उत्पादित होणाऱ्या वस्तूंचे प्रचार प्रसिद्धीसाठी प्रदर्शन भरवण्यांत येते. सदर प्रदर्शनात वस्तू विकण्यासाठी शबरी महामंडळाचे स्टॉल लावण्यांत येतात. तसेच वेळोवेळी विविध मान्यवर महामंडळास भेटी देत असतात. त्यांचे स्वागत पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देवुन करण्यात येते. यासोबतच स्वागताकरीता सदरील उत्पादने भेटवस्तु म्हणुन दिल्यास प्रचार प्रसिद्धी होण्यास मदत होईल. त्याचबरोबर सणासुदी करीता मान्यवरांना सदरील उत्पादने भेटवस्तु म्हणुन दिल्यास प्रचार प्रसिद्धी होण्यास मदत होईल. त्यासाठी होणारा खर्च शबरी महामंडळास प्राप्त होणाऱ्या २% प्रशासकीय खर्चातून खर्च करण्यांस मान्यता मिळणेकामी विषय महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सांदर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.२ :- FPO / वनधन यांचेमार्फत उत्पादित होणाऱ्या वस्तूंचे प्रचार प्रसिद्धी करणेकामी शबरी महामंडळाचे स्टॉल लावण्यासाठी तसेच सदरील उत्पादने भेटवस्तु म्हणुन देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच त्यावर होणारा खर्च महामंडळास प्राप्त होणाऱ्या २% प्रशासकीय खर्चातून खर्च करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे.**

**सुचक :-** मा.आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक
**अनुमोदक :-** मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**आयत्या वेळेचा विषय क्र.३:- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांना सन २०२३-२४ या वर्षाकरीता बोनस / सानुग्रह अनुदानास मंजुरी मिळणेबाबत.**

शासन निर्णय १३ डिसेंबर, १९९९ अन्वये महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचे कर्मचारी सेवानियम शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास लागू आहे. त्याअनुरोधाने महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या अधिकारी / कर्मचारी यांना ज्या धर्तीवर बोनस व सानुग्रह अनुदान अदा करण्यात येते त्याच धर्तीवर शबरी महामंडळाचे कर्मचाऱ्यांना सुध्दा बोनस व सानुग्रह अनुदान अदा करण्यात येते.

सन २०२३-२४ मध्ये रु.१८४३.९७ लक्ष नफा (Unaudited) झालेला आहे. त्याअनुषंगाने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांना रु.६०००/- इतके सानुग्रह अनुदान व रुपये ३५००/- बोनस अदा करण्यास करण्यास मंजुरी मिळणेकामी विषय महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सादर केला आहे.

खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | तपशिल | कर्मचारी संख्या | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | बोनस | ११ | ३८,५००/- |
| २ | सानुग्रह | १४ | ८४,०००/- |
| **एकूण** | | | **१,२२,५००/-** |

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.३ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातील कार्यरत व पात्र अधिकारी / कर्मचारी यांना सन २०२३-२४ या वर्षाकरीता बोनस व सानुग्रह अनुदानास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे.**

**सुचक :-** मा.आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक
**अनुमोदक :-** मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सर्व उपस्थित संचालकांचे आभार मानुन मा.अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले आहे.

व्यवस्थापक (प्रकल्प)

मा.महाव्यवस्थापक (प्रशासन)

मा.महाव्यवस्थापक (वित्त)

मा.व्यवस्थापकीय संचालक

मा.अध्यक्ष सो,
शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक.